
# मेहता मराठी ग्रंथजगत

मार्च, २०२६
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष सव्विसावे
अंक तिसरा



लेखक
**सुधा मूर्ती**
अनुवाद
**लीना सोहोनी**




**रोमांचक कथेतून इतिहासाचे कंगोरे उलगडत जाणारी लहानग्यांसाठीची विलक्षण कहाणी**

## साहित्य पुरस्कारासाठी आवाहन



# ‘प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार’



‘मेहता पब्लिशिंग हाऊस’चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **‘प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार’** देण्यास सुरुवात झाली. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली होती. या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
**₹ ३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
**₹ २०,०००/-**

## पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१ ऑक्टोबर, २०२५ ते ३० सप्टेंबर, २०२६ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर, २०२६ पर्यंत

पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो आमच्या पत्त्यावर पाठवावे.

या पुरस्काराची घोषणा डिसेंबर, २०२६ मध्ये केली जाईल.
१२ जानेवारी, २०२७ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

♦मार्च २०२६ ♦वर्ष सव्विसावे ♦अंक तिसरा

**संपादक**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
अंजली पटवर्धन

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाइन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**
मेहता पब्लिशिंग हाउस

**– अनुक्रमणिका –**


| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| प्रदर्शन | १० |
| मुलाखत | १२ |
| पुरस्कार | १४ |
| विशेष लेख | १६ |
| पुस्तक-परिचय | २८ |
| **पुस्तकाच्या पानांतून** | |
| शिवपत्नी महाराणी सईबाई | ३२ |
| सिकॅमोर रो | ३६ |
| आय ऑफ द नीडल | ४२ |
| स्माइल प्लीज | ४८ |
| थ्रिल्स | ५४ |
| दिनविशेष | ६१ |


संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.



## संपादकीय

# पुरुष-साहित्यिकांच्या लेखनातील ‘स्त्री-जाणिवां’ची अभिव्यक्ती

मराठी साहित्यविश्व उत्तरोत्तर अधिक व्यापक होत गेलेलं दिसतं. हा परीघ दिवसेंदिवस विस्तारत असल्याची अनुभूती विविधांगी साहित्यप्रकार वाचताना येतेच... नाही का! अशा वेळी प्रसिद्ध कवी दासू वैद्य यांच्या एका कवितेतील ओळी मनात रुंजी घालतात-

*‘आठवणींचा लेऊन शेला,*
*नटून बसली माय मराठी*
*दिवस झेलतो सुसाट वारा,*
*तरीही दिव्यात जिवंत वाती*
*जगण्यामधल्या अर्थासंगे,*
*बहकून गेले अक्षर-रान*



*वाऱ्यावरती थिरकत आले,*
*झाडावरूनी पिंपळपान...'*

खरोखरच, अनेक साहित्यिक आणि त्यांच्या साहित्यकृती यांचं जणू पिंपळपानच त्या क्षणी नजरेसमोर तरळतं. त्या साहित्यकृती आपल्या सर्वंकष जाणिवा समृद्ध करतात.

अशा समृद्ध साहित्यपरंपरेतला महत्त्वाचा साहित्यप्रवाह म्हणजे, 'स्त्रीवादी साहित्य.' आठ मार्चच्या 'जागतिक महिला दिना'च्या निमित्ताने अनेक कार्यक्रमांमध्ये स्त्रीवादी साहित्य आणि त्या अनुषंगाने काही उपक्रम यांचाही समावेश आढळतो. मराठी साहित्यक्षेत्रात स्त्रीवादी लेखनाची प्रगल्भ परंपरा खूप आधीपासूनच आहे. अर्थातच; विभावरी शिरूरकर, डॉ.तारा भवाळकर, गौरी देशपांडे, आशा बगे, सानिया, नीरजा अशा अनेक स्त्री-लेखिकांचं महत्त्वपूर्ण योगदान त्यात आहे.

तरीही, लक्षात घेण्याजोगी महत्त्वाची बाब म्हणजे- 'केवळ स्त्रियांनी लिहिलेलं ते स्त्रीवादी साहित्य'- असं नाही. तर, 'स्त्रीविषयक जाणिवांची सर्वांगीण अभिव्यक्ती' या साहित्यप्रवाहात अभिप्रेत असते. त्यामध्ये- स्त्री-मनाचं, स्त्री-जीवनाचं चित्रण करण्यासहित विशिष्ट प्रकारचा संघर्षही चित्रित होताना दिसतो. पुरुषसत्ताक व्यवस्थेतही तिची 'स्वतः'ची भाषा अथवा तिचा 'स्वतः'चा उद्‌गार टिपण्याची क्षमता या लेखनात दिसते. त्यातून स्त्रीच्या 'माणूसपणा'चा विचार यात आढळतो. म्हणूनच, स्त्रीविषयक जाणिवा केंद्रस्थानी ठेवून, त्याभोवती लेखनाचा परीघ विस्तारणारा हा साहित्यप्रवाह आहे.

नेमका हाच धागा पकडून ठेवत, स्त्री-लेखिकांच्या बरोबरीनेच, पुरुष-लेखकांचंही साहित्यिक योगदान त्यात आढळतं. विशेषत्वाने, स्त्री-पुरुष समानतेच्या अनुषंगाने त्यांनी लेखन केलेलं दिसतं. मुळातच, स्त्रीवादी साहित्यप्रवाहाचा स्वर १९६०नंतरच्या साहित्यविश्वात प्रकर्षाने ऐकू येऊ लागला. अगदी सुरुवातीला, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखनात या जाणिवा व्यक्त होताना दिसतात. निबंधलेखनाद्वारे त्यांनी स्त्री-पुरुष विषमतेवर प्रहार केला; तर 'मूकनायक' व 'बहिष्कृत भारत' या नियतकालिकांतून स्त्रियांचे प्रश्न हाताळले. नंतरच्या काळात महर्षी धोंडो केशव कर्वे, रघुनाथ कर्वे यांनीही सामाजिक-साहित्यिक स्तरावर विपुल कार्य

केलेलं दिसतं. विशेषकरून, स्त्री-शिक्षण व स्त्रियांचं सक्षमीकरण यांवर त्यांनी भर दिला आहे. खऱ्या अर्थी, पुरुषकेंद्री परिप्रेक्ष्याच्या पलीकडचे विचार पुरुष-साहित्यिकांच्या लेखनात आढळतात.

या पार्श्वभूमीवर; मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुरुष-साहित्यिकांचंही लेखन स्त्रीवादी साहित्यप्रवाह समृद्ध करणारं आहे. सामाजिक-आर्थिक वास्तव, संघर्षमय चित्रण, स्त्री-पुरुष समानतेची जाणीव, स्त्रियांच्या मनोविश्वाचा वेध ही त्यांच्या स्त्रीवादी लेखनाची वैशिष्ट्यं आहेत. प्रसंगी स्त्रियांच्या अस्तित्वाची बाजू मांडणारं लेखन दिसतं. मात्र, काही ठिकाणी लेखनात स्त्रियांविषयी विशिष्ट सहानुभूतिपूर्वक दृष्टिकोनही अंतर्भूत झालेला दिसतो. स्त्रीवादी जाणिवांची आपल्या लेखनात अभिव्यक्ती या दृष्टीने मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुरुष-लेखकांमध्ये व.पु.काळे, व्यंकटेश माडगूळकर, आनंद यादव, एस.एल.भैरप्पा, अरुण शौरी, विश्वास पाटील यांच्यासारख्या लेखकांचा प्रकर्षाने समावेश करता येतो. विशेषत्वाने, एस.एल.भैरप्पा यांचं लेखन स्त्रीची भूमिका, स्त्री-मुक्तीच्या आधुनिक संकल्पना यांची चिकित्सा करणारं आहे. स्त्रीची गुंतागुंतीची मानसिकता त्यात चित्रित होते. तर, व्यंकटेश माडगूळकर यांचं लेखन स्त्रीचा परिस्थितिजन्य संघर्ष टिपणारं आहे. या अनुषंगाने- व.पु.काळे यांचा 'सखी' हा कथासंग्रह, व्यंकटेश माडगूळकर यांची 'करुणाष्टक', एस.एल.भैरप्पा यांची 'तडा' आणि आनंद यादव यांची 'झोंबी', विश्वास पाटील यांची 'आंबी' या साहित्यकृती वैशिष्ट्यपूर्ण ठरतात.

लोकप्रिय साहित्यिक व.पु.काळे यांचा 'सखी' हा तितकाच लोकप्रिय कथासंग्रह. यामध्ये सखीचं अस्तित्व, मैत्रीची वैचारिक उंची यावर भाष्य केलं आहे. व्यंकटेश माडगूळकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेलं 'करुणाष्टक' हे आई आणि तिच्या आठ मुलांचं करुणाष्टक आहे. परिस्थितीच्या वाळवंटातला तिचा खडतर प्रवास त्यात अधोरेखित झाला आहे. वास्तविक, 'झोंबी' ही प्रख्यात लेखक आनंद यादव यांची आत्मकथनात्मक कादंबरी. मात्र, त्यात आईच्या परिस्थितिजन्य संघर्षाचं हृदयस्पर्शी चित्रण आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत असतानाही, आपल्या मुलाला शिकवण्याची तिच्या ठायीची ऊर्मी त्यात व्यक्त होते. डॉ. एस.एल.भैरप्पा यांनी लिहिलेली व उमा कुलकर्णी यांनी अनुवादित केलेली 'तडा' ही वैशिष्ट्यपूर्ण कादंबरी. स्त्री-मुक्तीच्या अनुषंगाने अनेकविध पदर उलगडवून दाखवणारी ही कादंबरी

स्त्रीच्या अंतर्यामीचा ‘माणूसपणा’चा गाभा समजून घ्यायला हवा, ही जाणीव उद्धृत करणारी आहे. विश्वास पाटील यांची ‘आंबी’ ही स्त्रीप्रधान कादंबरी आहे. ग्रामीण तरुणीच्या संघर्षाची व जिद्दीची कहाणी त्यात चित्रित झाली आहे.

या सर्व लेखकांच्या चित्तवेधक लेखनशैलीतून स्त्री-जाणिवा प्रगल्भतेने व्यक्त होतात. स्त्रियांचा स्वतःचा उद्गार मांडणारं हे लेखन आहे; परंतु सगळ्यांत महत्त्वाचं म्हणजे, विशिष्ट अशी पुरुषसत्ताक वैचारिक बैठक, स्त्रीवादी दृष्टिकोन यांच्याही पल्याड जात आदिम प्रेरणांचा वेध घेणारं, त्या दृष्टीने वाचकांच्या अनुभवकक्षा रुंदावणारं हे लेखन आहे. किंबहुना, सजग व समृद्ध असा वाचकवर्ग घडवण्याची क्षमता बाळगणारं हे समग्र लेखन आहे. या दृष्टिकोनातून विचार करता, पुरुष-साहित्यिकांचं लेखन; म्हणजे स्त्री-जाणिवांची अभिव्यक्ती असलेलं लेखन हे कालातीत आहे.

अखिल मेहता

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी**
**आजच वर्गणीदार व्हा**

आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

*Available on*

amazonkindle | Google Play Books

अधिक माहिती जाणून घेण्यासाठी
आम्हाला फॉलो करत रहा!

**http://www.facebook.com/mehtapublishinghouse**


टी बुक क्लब
मेहता पब्लिशिंग हाऊस
टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!
₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा.
पोस्टेज खर्च अतिरिक्त
BOOK CLUB
आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं
* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक
'टी बुक क्लब' ची ग्रंथसूचि पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा
फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५
सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx


नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर
– थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड, किंडल आणि अ‍ॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!
॥ स्वामी ॥
रणजित देसाई
ebook available on :
Google Play Books
amazon kindle
Get it on Apple Books

# प्रदर्शन

## गोवा ग्रंथ-प्रदर्शन

नॅशनल बुक ट्रस्ट (एनबीटी) आणि लोकमान्य कल्चरल फाउन्डेशन यांच्या सहकार्याने 'गोवा पुस्तक-महोत्सव' आयोजित करण्यात आला होता. पणजी येथील भाऊसाहेब बांदोडकर मैदानावर दिनांक ४ ते ८ फेब्रुवारी या दरम्यान हा पुस्तक-महोत्सव संपन्न झाला. या माध्यमातून वाचन-संस्कृतीचा व पुस्तक-संस्कृतीचा जागर करण्यात आला.

या वेळी मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ग्रंथ दालनाला वाचनप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या प्रसंगी काही मान्यवरांनीही मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ग्रंथदालनाला भेट दिली. त्यांमध्ये गोव्याचे राज्यपाल पुसापती अशोक गजपती राजू, सभापती गणेश गावकर व केंद्रीय राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांचा समावेश होता. त्या वेळी मेहता पब्लिशिंग हाऊसचे संचालक अखिल मेहता उपस्थित होते. त्याचप्रमाणे लोकप्रिय निर्माता-दिग्दर्शक, अभिनेते सचिन पिळगांवकर यांनीही महोत्सवास भेट दिली. या

वेळी त्यांनी लिहिलेल्या व मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेल्या 'हाच माझा मार्ग' या पुस्तकाच्या निमित्ताने त्यांच्याशी मुलाखतीद्वारे दिलखुलास संवाद साधला गेला.

एकूणच, वाचनाची आवड वृद्धिंगत करण्यासाठी, तसंच साहित्यिक-प्रकाशक यांना प्रोत्साहनपर या दृष्टीने हा पुस्तक-महोत्सव लक्षणीय ठरला.

## मुंबई ग्रंथ-प्रदर्शन

'मराठी भाषा गौरव दिना'च्या निमित्ताने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने दादर येथे 'अभिजात पुस्तक-प्रदर्शना'चं आयोजन करण्यात आलं होतं. दादरमधील शिवाजी पार्क येथे दि. २६ फेब्रुवारी ते १ मार्च दरम्यान हे ग्रंथ-प्रदर्शन पार पडलं. वाचनप्रेमींना एकाच ठिकाणी सर्वोत्कृष्ट साहित्य उपलब्ध करून देण्यात आलं.

वाचकांच्या पसंतीस उतरलेली विविध पुस्तके या प्रदर्शनात ठेवण्यात आली होती. यामध्ये नव्या-जुन्या लेखकांच्या साहित्यकृतींचा समावेश होता. नामांकित प्रकाशकांनी यात आपला सहभाग नोंदवला. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ग्रंथ-दालनाला रसिक वाचकांचा उत्कृष्ट प्रतिसाद लाभला. विशेष उल्लेखनीय अशी बाब म्हणजे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष माननीय राज ठाकरे यांनी मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ग्रंथ-दालनाला सपत्नीक भेट दिली.

मराठी साहित्याचा प्रसार करण्याच्या अनुषंगाने हे अभिजात पुस्तक-प्रदर्शन हा महत्त्वाचा मंच ठरला.

# मुलाखत

## एआय, चॅट जीपीटी यांच्या युगातही स्वतःची कल्पकता, नवनिर्मिती जपणं अत्यावश्यक...

- ज्येष्ठ अनुवादिका लीना सोहोनी


ज्ञान प्रबोधिनीच्या निगडी केंद्राच्या वतीने 'वाचन वर्षा'निमित्त ज्येष्ठ अनुवादिका लीना सोहोनी यांच्या प्रकट मुलाखतीचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यामध्ये शालेय जीवनापासूनची वाचनाची आवड ते सत्तरहून अधिक पुस्तकं अनुवादित करण्यापर्यंतचा समग्र प्रवास लीना सोहोनी यांनी उलगडला. त्या वेळी त्यांनी अनुवाद-प्रक्रियेशी संबंधित अनेक गोष्टी स्पष्ट केल्या. विशेषत्वाने, 'अनुवाद' आणि 'भाषांतर' यामधला फरक त्यांनी उद्धृत केला. तो मांडत असताना अनुवाद करताना वापरावयाचे विविध संदर्भ, तसंच मूळ लेखकाच्या भावनेला धक्का न लावता, मूळ पुस्तकाच्या जवळचा अनुवाद कसा करायचा, याचं मर्म त्यांनी उलगडलं. त्याचप्रमाणे, एआय, चॅट जीपीटी



यांच्या युगातही स्वतःची कल्पकता, नवनिर्मिती जपणं अत्यावश्यक असल्याचं त्यांनी सांगितलं. यासोबतच, जेफ्री आर्चर, सुधा मूर्ती अशा मान्यवर साहित्यिकांच्या आठवणींनाही या वेळी त्यांनी उजाळा दिला.

मराठीच्या ज्येष्ठ अध्यापिका राजश्री मराठे आणि पालक तृप्ती गोडसे यांनी त्यांच्याशी संवाद साधला. तसंच, विद्यार्थ्यांच्या निवडक प्रश्नांनाही लीना सोहोनी यांनी उत्तरं दली. मेहता पब्लिशिंग हाऊसने लीना सोहोनी यांनी अनुवादित केलेली आशयघन अशी अनेक पुस्तकं वाचकांच्या भेटीस आणली आहेत.

◆



# पुरस्कार

## डॉ.तारा भवाळकर यांना जीवनगौरव पुरस्कार

कोल्हापूर : मराठी साहित्यक्षेत्रातील ज्येष्ठ व प्रसिद्ध लेखिका, लोकसाहित्याच्या अभ्यासक आणि माजी साहित्य-संमेलनाध्यक्षा डॉ.तारा भवाळकर यांना 'डॉ.रा.तु.भगत जीवनगौरव पुरस्कारा'ने नुकतंच सन्मानित करण्यात आलं. या वेळी कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तर, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ.एम.बी.शेख हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कोल्हापूर येथे १८ फेब्रुवारीला हा कार्यक्रम पार पडला.

डॉ.तारा भवाळकर यांनी साहित्य व संस्कृतीच्या क्षेत्रात अभूतपूर्व योगदान दिलं आहे. महाराष्ट्रातील विचारविश्वात 'व्यासंगी विदुषी' अशी त्यांची ओळख आहे. मराठी भाषा आणि साहित्य, नाटक आणि रंगभूमी, तसंच लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती हे त्यांच्या आस्थेचे विषय आहेत. त्यांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग सुरुवातीपासूनच राहिला आहे. 'मायवाटेचा मागोवा', 'यक्षगान आणि मराठी नाट्यपरंपरा' अशा काही साहित्यकृती आहेत. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे त्यांचं 'मिथक आणि नाटक' हे पुस्तक प्रकाशित करण्यात आलं आहे.

◆


## नाशिक विश्वसाहित्य संमेलनात विविध पुरस्कारांचे वितरण

नाशिक : चौथं ‘विश्व मराठी साहित्य संमेलन’ हे २६ फेब्रुवारी ते १ मार्च या कालावधीत नाशिक येथे पार पडलं. राज्य शासनाच्या ‘मराठी भाषा विभागा’तर्फे या साहित्य संमेलनाचं आयोजन करण्यात आलं होतं.

मराठी अस्मितेला पंख देणाऱ्या, संवेदनशील विचार रुजवणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिकांसह भाषा-संवर्धकाचाही संमेलनात सन्मान करण्यात आला.

‘कोसला’कार आणि ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ साहित्यिक भालचंद्र नेमाडे यांना यंदाचा ‘साहित्यभूषण पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. तसंच, २०२५चा ‘विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार’ श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला. नांदेड येथील निर्मल प्रकाशन संस्थेला ‘श्री.पु.भागवत पुरस्कारा’ने सन्मानित करण्यात आलं. डॉ.दिलीप धोंडगे यांना आणि आपटे वाचन मंदिर यांना ‘डॉ.अशोक केळकर भाषा-अभ्यासक पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. विनोद नारायण कुलकर्णी यांना आणि कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषद यांना ‘कविवर्य मंगेश पाडगांवकर भाषा-संवर्धक पुरस्कार’ प्रदान करण्यात आला. ‘कलारत्न पुरस्कार’ संगीतकार अजय आणि अतुल गोगावले यांना प्रदान करण्यात आला. या वर्षीपासून ‘विश्व मराठी संमेलन विशेष पुरस्कार’ सुरू करण्यात आला असून, तो आळंदी येथील शांतिब्रह्म गुरुवर्य मारुतीबाबा कुरेकर यांना प्रदान करण्यात आला. साहित्य क्षेत्राशी संबंधित एकूण ३५ पुरस्कार या वेळी प्रदान करण्यात आले. यांपैकी काही पुरस्कारांचं वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते करण्यात आलं. येथील केटीएचएम महाविद्यालयाच्या कविवर्य कुसुमाग्रज नगरीत संमेलनाच्या उद्‌घाटनाच्या दिवशी या पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं.

◆



## विशेष लेख

### मिथक आणि नाटक

'मिथक' म्हणजे 'पुराणकथा अथवा दैवतकथा' : इंग्रजीतील 'मिथ' या संज्ञेचा भारतीय पर्याय. अलौकिकाचा रंग ल्यायलेली लोकानुभूती व्यक्त करणारी कथा म्हणजे 'मिथक.' आद्य मिथके ही विधींशी संबंधित होती. मिथक आणि विधी यांचा संबंध इतका अभिन्न आहे की, मिथक हे विधीचे 'शब्द'रूप आहे, तर विधी हे मिथकाचे 'क्रिया'रूप आहे. मिथक म्हणजे नाट्यात्म विधींची संहिता होय, तर विधी म्हणजे मिथकाचे प्रयोगरूप होय. या नाट्यात्म आद्य यातुविधीतूनच नाटक उदय पावले/उत्क्रांत झाले. नाट्योदयासंबंधीच्या या विलक्षण तथ्याच्या प्रकाशात १९२०पर्यंतच्या मराठी पौराणिक नाटकाची जडणघडण उलगडून दाखवणारा हा ग्रंथ आहे : 'मिथक आणि नाटक.'(- डॉ.रा.चिं.ढेरे)

'मिथक आणि नाटक' या पुस्तकासंबंधी

थोडासा परिचय करून द्यायचा आहे. ‘मिथक’ हा शब्द इंग्रजी ‘मिथ’ या शब्दावरून मराठीत आला आहे. मराठी; म्हणजे भारतीय भाषांनी उचलला आहे. ‘मिथ’- ‘Myth’ या स्पेलिंगचं ‘मिथक’ हे भारतीय रूप. मिथ या शब्दामध्ये मिथ्यत्वाचा आभास होतो. म्हणजे, जे खरं नाही; जे काल्पनिक आहे, ते मिथ; परंतु भारतीय संकल्पनेमध्ये ‘मिथ’ हा जो संस्कृत धातू आहे, त्याचा अर्थ होतो- ‘जोडणं.’ काय जोडायचं? सत्य आणि कल्पित. वास्तव आणि आभास किंवा लौकिक आणि अलैकिक यांना जोडणं. त्यांना जोडून जी कलाकृती निर्माण होते, ते मिथक. बंगालीमध्ये, हिंदीमध्ये ‘मिथक’ हा शब्द आता या अर्थाने रूढ झालेला आहे, रूढार्थाने आपण जिला ‘पुराणकथा’ असं म्हणतो. तर ‘पुराकथा’, ‘प्राक्‌कथा’, ‘आदिकथा’, ‘दिव्यकथा’ असे निरनिराळे शब्द निरनिराळ्या काळांमध्ये वापरले गेले आहेत. या अर्थाने तो ‘मिथक’ शब्द या पुस्तकामध्ये वापरलेला आहे.

नाटक निर्माणच कसं झालं? तर, नाटकाचा पाया ‘मिथ’ हा आहे. म्हणजे ‘पुराकथा’ आहे. पुराकथा किंवा आदिकथा या विश्वाच्या पाठीवर प्रथम निर्माण झालेल्या कथा. ही आदिकथा कशी आहे? ती निसर्गाशी निगडित आहे. किंबहुना, निसर्गातूनच निर्माण झालेली आहे. सर्वच कलांचा उगम हा निसर्गाची नक्कल करताना झालेला आहे. म्हणून कलांचं वर्णन करताना म्हणतात- ‘Art immitates nature.’ कला ही निसर्गाची अनुकृती असते, नक्कल असते. प्रतिकृती असते. म्हणून, सर्व प्रकारच्या कला मुळातच निसर्गातून निर्माण झालेल्या आहेत. त्यालाच परंपरेमध्ये ‘पुराणकथा’ असं म्हटलंय. ‘पुराणकथा’ म्हटलं की, आपल्या- विशेषतः भारतीयांच्या डोळ्यांसमोर धर्माशी संबंधित संकल्पना येतात. धर्म ही संकल्पना आदिम अशा मिथकातून किंवा आदिम श्रद्धेतून निर्माण झाली आहे. आदिम श्रद्धेला ‘यातुश्रद्धा’ म्हटलेलं आहे. यातुश्रद्धेलाच इंग्रजी शब्द वापरला जातो- ‘Magical Faith.’ जादूसरशी होणाऱ्या कृतीवर असलेला विश्वास म्हणजे, ‘चमत्कृती.’ सगळ्या आद्यकथा निसर्गाच्या चमत्कृतीतून निर्माण झाल्या आहेत. नुसत्या कथाच नव्हेत;

तर सगळ्याच कला निसर्गाची नक्कल करताकरता तयार झाल्या आहेत. म्हणून पहिल्यांदा 'नाट्य' शब्दाची व्युत्पत्ती सांगताना भरत नाट्यशास्त्राने म्हटलेलं आहे की, नृत्य म्हणजे नाच. त्या नाचाचं अभिरूप जे आहे, 'नृत्.' म्हणजे ताल. तो ताल कसा? पायाने जो ठेका वा ताल धरला जातो, तो. सबंध निसर्गामध्ये हा ताल महत्त्वाचा आहे. लय महत्त्वाची आहे. त्यातून संगीत, नृत्य, नाट्य, भाषा, कथा या सर्व कला निर्माण झाल्या आहेत, असा याचा मूळ अर्थ आहे. जगाच्या पाठीवरच्या सर्व लोकपरंपरा अथवा नाट्याचा उगम पाहिला, तर तो धर्मश्रद्धेशी निगडित असलेला आहे. म्हणजे, ग्रीकांमध्ये 'डिथिरॅम्ब' नावाचा धार्मिक उत्सव असे. त्या उत्सवात नृत्य-नाट्यात्मक कला सादर केली जायची. त्यातून नाट्य निर्माण झालं, असा पाश्चिमात्यांचाही विश्वास आहे. त्यांची ती भूमिका आहे.

आपल्याकडे भारतभरच्या सगळ्या लोकपरंपरा पाहिल्या- मग ते कोकणातले दशावतार असू देत, किंवा कर्नाटकातले यक्षगान असू दे, अथवा दक्षिणेकडची नाटकं असू देत; सगळ्यांच्या मुळाशी पुराणकथा आहे. ती त्यातून सादर केली जाते... अगदी बंगालमधल्या जात्रामरपर्यंत.

त्या पुराणकथा निरनिराळ्या प्रकारच्या असतात. त्यांतली मूळ कथा जी आहे, ती सृष्टीच्या निर्मितीशी निगडित आहे. या कथांना 'सूर्यकथा' म्हटलं जातं. आपल्या अनेक देवदेवतांचं मूळ या सूर्यकथेत आहे. सगळ्या आदिम लोककला नृत्य, नाट्य, संगीत यांनी युक्त आहेत. सर्व कलांचा संगम नाट्यामध्ये होतो. त्यात साहित्य आहे; म्हणजे कथा आहे. संवाद, गाणं, नृत्य-ताल-लय आहे. शिल्प-चित्र आहे. पात्रांची वेशभूषा-केशभूषा आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या कलांचं मूळ तिथे असल्याने लोककलांना- 'Total Expression of Life' म्हटलं जातं. म्हणजे, जीवनाची समग्र अभिव्यक्ती त्यांमधून होते.

'पहिलं नाटक कसं निर्माण झालं' हे पाहायला गेलं, तर- ५०-५५ वर्षांपूर्वी मी सांगलीला आल्यानंतर माझं तिकडे लक्ष वेधलं गेलं. सांगली ही 'मराठी नाटकाची नाट्यपंढरी' असं म्हटलं जातं. तिथे विष्णुदास भावे

यांनी पहिलं नाटक निर्माण केलं, असं म्हटलं जातं. म्हणून मी त्या दृष्टीने त्यांच्या नाटकांचा शोध घेतला. त्यामध्ये मुळारंभाच्या दृष्टीने दोन पुस्तकं महत्त्वाची आहेत- विष्णुदासांचे नातू वासुदेवराव भावे(इंजिनिअर भावे) यांनी लिहिलेलं विष्णुदासांचं चरित्र आणि स्वतः विष्णुदासांनी सुरुवातीच्या काळामध्ये ज्या नाट्यकविता लिहिल्या, त्यांचा संग्रह १८८५मध्ये खुद्द त्यांच्या काळात निर्माण झाला- त्याला त्यांनी लिहिलेली प्रस्तावना आणि सगळ्या नाट्यकविता; कारण विष्णुदासांचं पहिलं नाटक हे कर्नाटकी भागवत नाटकांचं अनुकरण करून निर्माण झालं होतं, असं इतिहास सांगतो. त्या काळात चिंतामणराव पटवर्धन हे सांगलीचे संस्थानिक होते आणि कर्नाटकात त्यांच्या अनेक जहागिऱ्या होत्या. त्यामुळे कर्नाटक आणि महाराष्ट्र येथील व्यापारी-कलावंतांची देवाणघेवाण, जाणं-येणं असे. १८४२मध्ये कर्नाटकातली भागवत नाटकमंडळी सांगलीमध्ये आली. त्यांनी कानडीमधून एक प्रयोग राजेसाहेबांसमोर सादर केला. त्यांना असं वाटलं, की अशा प्रकारचा प्रयोग मराठीमध्ये व्हावा. राजेसाहेबांच्या पदरी असलेल्या अमृतराव भावे यांचा विष्णुदास हा तरुण मुलगा होता. या मुलाला गाण्या-बजावण्याचा नाद असल्याने तो अशी कलाकृती निर्माण करू शकेल, असं वाटल्यामुळे त्याला बोलावून 'असं नाटक मराठीत करशील का?' हे विचारलं. नंतर १८४३मध्ये विष्णुदासांनी पहिलं मराठी नाटक रंगमंचावर सादर केलं. तोपर्यंत 'रंगमंच' नावाची गोष्ट निर्माण झाली नव्हती. तो प्रयोग राजेसाहेबांनी पाहिला. नाटकाचं नाव होतं- 'सीतास्वयंवर आख्यान आणि अहिल्योद्धार.' असं जोड-आख्यान होतं. 'नाटक' हा शब्द अजून आलेला नव्हता. 'आख्यान' हा शब्द दीर्घ काळपर्यंत वापरला जात होता. म्हणजे, मुंबईला तिकीट लावून नाटकांचे प्रयोग सुरू झाल्यानंतरही 'आख्यान' असा शब्द दीर्घ काळपर्यंत वापरला जायचा. म्हणजे, 'रामाचं आख्यान', 'सीतेचं आख्यान', किंवा 'परशुरामाचं आख्यान', 'ययातिचं आख्यान.' 'आख्यान' हा शब्द दीर्घ काळपर्यंत वापरला जात होता. तो कीर्तनामध्ये असतो. कीर्तन आणि नाटक या सादरीकरणात पुष्कळ साम्य आहे. मराठीतल्या संशोधकांनी

असं म्हटलं आहे, की नाटक हे कीर्तनातून निर्माण झालेलं आहे. विशेषतः, किर्लोस्करांनी पुढे जेव्हा संगीत नाटक सुरू केलं, ते कीर्तनाच्या अनुकरणातून केलं, अशी मांडणी काही संशोधकांनी केलेली आहे.

विष्णुदासांचं सुरुवातीचं नाटक कसं होतं? आज ज्याला गद्य-पद्ययुक्त नाटक म्हणतो; म्हणजे पदं स्वतंत्र असतात आणि गद्य संवाद वेगळे अशा प्रकारचं नव्हतं. ती नुसती पदं लिहिलेली होती. सीतास्वयंवर आख्यान या शब्दामध्ये अनुस्यूत असलेला कथाभाग काही पदांमधून सरळसोट- अशी ती कथा सांगितली होती. निरनिराळी पदं होती. स्वतः विष्णुदास हे सूत्रधार होते. त्या काळात सूत्रधार अतिशय महत्त्वाचा मानला जात होता; कारण त्याच्या हातात नाटकाची सगळी सूत्रं होती.

आपल्या लोकपरंपरेमध्येही एक प्रमुख असतो. तमाशामध्ये वेगळं नाव आहे, त्याला 'सरदार' असे म्हणतात. कुठे त्याला 'शाहीर' म्हणतात, कुठे 'सूत्रधार' म्हणतात. दक्षिणेकडे 'भागवत' म्हणतात. तो त्या आख्यानाच्या कथानकातली सगळी गाणी म्हणतो. एक प्रसंग गाण्यातून वर्णन करायचा, मग थांबायचं. नंतर मग प्रसंगात वर्णन केलेली स्वतंत्र पात्रं रंगमंचावर येऊन पदात वर्णन केलेला संवाद उत्स्फूर्तपणे म्हणतात. म्हणजे, सीता-राम-दशरथ, जे कोणी असतील- ते. मग पुन्हा दुसरं पद म्हटलं जातं. नाटक पुढे सरकतं. जसं तमाशामध्ये उत्स्फूर्त संवाद म्हणतात, गाणी मात्र आधी रचलेली असतात. त्याप्रमाणे हे सुरुवातीचं नाटक होतं. अशाच प्रकारची नाटकं बहुतेक लोकपरंपरांमध्ये होती. त्यामुळे मराठीतलं पहिलं नाटक हे कन्नड नाटकाच्या अनुकरणातून आलेलं आहे, असं म्हटलं जातं आणि ते सत्य आहे. विष्णुदासांनी ते नाटक सादर केलं. राजेसाहेबांना ते आवडलं. लोकांनाही आवडलं. मग विष्णुदासांनी एका वर्षात रामकथेवर अनेक नाटकं सादर केली आणि अनेक कथानकं रचली. त्या सगळ्यांचा संग्रह म्हणून 'नाट्यकवितासंग्रह' प्रकाशित केला. मग त्यांचं अनुकरण करून त्या काळात आसपासच्या अनेक कलावंतांनी विविध प्रकारची नाटकं सादर केली. नाट्यकविता तयार करून उत्स्फूर्त भाषणं बोलायची. सुरुवातीला गणपती आणि

सरस्वतीचं आगमन व्हायचं. गणपतीच्या सोंगासाठी गणपतीचा मुखवटा तो नट धारण करायचा. सरस्वतीच्या सोंगासाठी एखाद्या लहान मुलाला साडी नेसवून कमरेला मोराचा पिसारा बांधला जायचा. गणपती आणि सरस्वती नाचत असत. त्या वेळी गणेशवंदनेसारखं पद सादर करण्याची प्रथा होती. यातून आपल्याला पुढे नांदीविधी उत्क्रांत झालेला दिसतो. तो भरत नाट्यशास्त्रात सांगितला आहे. नंतर विदूषक यायचा. तो हास्यास्पद अंगविक्षेप करायचा. पुन्हा पद म्हटलं जायचं. असं करतकरत कथानक पुढे जायचं. सगळ्यांत शेवटी सगळी पात्रं रंगमंचावर यायची आणि मंगलाचरण व्हायचं. मंगलाचरण म्हणजे समाप्तीचं पद. त्यात सर्वांना सुखद व्हावं असं- 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु, सर्वे सन्तु निरामयः' अशा प्रार्थनेचा आशय असलेलं गाणं सगळे जण मिळून सादर करायचे. पाऊसपाणी वेळेवर पडू देत, पिकं नीट येऊ देत, सगळी माणसं निरोगी राहू देत- अशा भौतिक कामना त्यात व्यक्त केल्या जायच्या. अशा प्रकारचं मंगलाचरण- भरतवाक्य- असं संस्कृतमध्ये म्हटलं आहे, ते दीर्घ काळपर्यंत सादर होत असे. सुरुवातीच्या गणपती-सरस्वतीचं दृश्य नांदीविधीत आलेलं दिसतं. नांदीविधी हा संस्कृत नाटकाच्या अनुकरणातून आलेला एक विधी आहे.

पहिलं नाटक हे विधिनाट्यच आहे. कुठल्याही देवतेशी संबंधित अशा प्रकारचं नाट्य कोणत्यातरी उत्सवाच्या निमित्ताने सादर केलं जातं. आजही आपल्याला जत्रेत आणि यात्रेत असंच दिसतं. त्यात त्या देवाच्या संबंधीची गाणी व कथा सादर होतात. म्हणून पहिलं नाटक हे विधिनाट्य. विधिनाट्य- 'रिच्युअल ड्रामा.' विष्णुदासांचं नाटक जरी लौकिक नाटक असलं, म्हणजे करमणुकीसाठी असलं, तरी त्यामध्ये विधिनाट्याचे अवशेष दिसतात. कर्नाटकात अशा प्रकारची नाटकं सादर केली जातात, रामाच्या कथेशीच बहुधा बांधलेली असतात; कारण दशावतारांमधले राम-कृष्ण या दोन अवतारांच्या ज्या कथा आहेत, त्या 'लीलाकथा' म्हणून प्रसिद्ध आहेत. उत्तरेकडे रामलीला मोठ्या प्रमाणावर होते, हे आपल्याला माहीत आहे. आपल्याकडे रामकथेवरची नाटकं सुरुवातीला महाराष्ट्र-कर्नाटकात खूप मोठ्या प्रमाणावर होत असत- कर्नाटकात त्याला 'रामावतार-आटा',

तर महाराष्ट्रात विष्णुदासांच्या काळात 'रामावतारी खेळ' असं म्हटलं आहे. 'नाटक' हा शब्द उशिरा आला आहे. आधी 'आख्यान' म्हणत, मग 'खेळ' म्हणू लागले. इंग्रजीमध्ये नाटकासाठी 'प्ले' म्हणजे खेळ हा शब्द आहे. खेळ कशासाठी? तर, रंजनासाठी. देवतेशी संबंधित असलेल्या विधीत धर्मश्रद्धा आहे. विध्यात्मक आचरणही आहे. दुसरीकडे रंजनही आहे. त्यामुळे विधिनाट्यामध्ये श्रद्धा आणि रंजन हे एकत्रित आलेलं दिसतं. त्यामुळे त्या काळात विष्णुदासांच्या नाटकांच्या मुळांचा शोध घेत असताना मी कोकण, कर्नाटक, गोवा इथले वेगवेगळे लोककलाप्रकार; दक्षिणेकडे तंजावर येथील लोककलाप्रकार ते केरळमधील कथकली नाटक या सगळ्या प्रदेशांत पुष्कळ भ्रमंती केली. सगळ्यांचा क्षेत्रीय अभ्यास केला. त्यातून मराठी नाटक निर्माणच कसं झालं, या नाट्योदयाची मीमांसा केलेली आहे. ती महत्त्वाची आहे. तो भाग खूप विस्ताराचा आहे; परंतु या पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणामध्ये त्याचा परामर्श थोडक्यात घेतला आहे.

त्यानंतरचा जो भाग आहे, तो म्हणजे- विष्णुदासांचं नाटक विकसित कसं होत गेलं? मग आपण बघतो, की संगीत रंगभूमी महाराष्ट्रात आली. संगीत रगंभूमीचे निर्माते अण्णासाहेब किर्लोस्कर; म्हणजे बळवंत पांडुरंग किर्लोस्कर. हे किर्लोस्कर बेळगावचे. ते दीर्घ काळ सांगलीत राहत असल्याने 'सांगलीचे नाटककार' असं समजलं जातं. सुरुवातीला विष्णुदासांच्या आख्यानाची नक्कल सगळ्या नाटककारांनी केली. किर्लोस्करही सुरुवातीला फक्त पदं लिहीत असत. बऱ्याच काळानंतर त्यांनी गद्यसंवाद लिहायला सुरुवात केली. त्याच्याबद्दलही असं म्हणतात, की सांगलीजवळच्या मिरज येथील बळवंतराव मराठे यांनी गद्यसंवाद व संगीत वेगवेगळे लिहिण्यास सुरुवात केली. नंतर प्रकर्षाने दिसतं- ते किर्लोस्करांच्या काळात. म्हणून, काही टीकाकार गमतीने म्हणतात,की किर्लोस्करांनी संगीत नाटक निर्माण केलं याचा अर्थ असा की, मुळात ते पूर्ण संगीतच होतं. त्याच्या मध्ये-मध्ये गद्य संवाद घातले. म्हणून जुन्या काळातल्या सगळ्या संगीत नाटकांमध्ये पदांची संख्या भरपूर असे. आपण ऐकतो, की एखाद्या नाटकात ८०-८५ पदं असत. दीर्घ काळपर्यंत

संगीतामध्येच नाटकाच्या सादरीकरणाचा वेळ जायचा. संगीताच्या सादरीकरणाला वेळ लागतो, त्यामानाने गद्यसंवाद कमी असतात. दोन घटना जोडण्यापुरतेच असतात. किर्लोस्करांचं पहिलं संगीत नाटक 'सौभद्र'- यात पदांची संख्या भरपूर आहे. किर्लोस्करांनी संगीत नाटक निर्माण केलं. अशी प्रथा तेव्हापासून रुजली. नाटकामध्ये पदांबरोबर कथानक यायला सुरुवात झाली. गद्य-पद्य मिश्रित कथानक सुरू झालं. नंतरच्या काळात पदांची संख्या क्रमाक्रमाने कमी झाली. गद्यसंहितेला जास्त महत्त्व आलं. कथानकाला महत्त्व आलं. किर्लोस्करांच्या नंतरचे नाटककार सांगलीतलेच आहेत. किर्लोस्करांच्या नंतरचे महत्त्वाचे नाटककार- गोविंद बल्लाळ देवल. त्यांचं 'संगीत शारदा' आपल्याला माहीत आहे; पण त्यांची सुरुवातीच्या काळातली नाटकं मृच्छकटिकसारखी संस्कृत नाटकांची भाषांतरं होती. किर्लोस्करांनी सुरुवातीला 'शाकुंतल'चं भाषांतर केलं होतं. त्यावरून संस्कृत-मराठी यांच्या मिश्रणातून नवीन नाटकाचा आकृतिबंध तयार झाला. देवलांनी सुरुवातीला संस्कृत नाटकांची रूपांतरं केली. इंग्रजी नाटकांची रूपांतरं पुढे सुरू झाली. संस्कृत नाटकांचे बरेचसे घटक त्यात आले. किर्लोस्करांनी 'सौभद्र' नाटकाच्या प्रस्तावनेत लिहिलं आहे की, कथानकाच्या दृष्टीने काही अंशी इंग्रजीचं अनुकरण केलं असलं तरी या नाटकात रसपरिपोष आहे. पुढच्या काळात कथानकाला बरंचसं महत्त्व आणि त्याला पूरक संगीताची पदं येऊ लागली. नाटकात नटाचा अभिनय आणि संगीतकार अशा स्वतंत्र गोष्टी निर्माण झाल्या. गाणारे नट महत्त्वाचे ठरले, म्हणून पुढच्या काळात बालगंधर्व महत्त्वाचे ठरले.

या पुस्तकात विष्णुदास, किर्लोस्कर यांचं संगीत नाटक कसं आलं हे मांडलं आहे. देवलांनी तर पुढचा टप्पा गाठला. त्यांचं संगीत आणि गद्य परस्परांनुकूल आणि पूरक होतं असं म्हटलं जातं किंवा आहे. संगीत कथानकाला पुढे नेणारं होतं. देवलांनी महत्त्वाची आणखी एक गोष्ट केली. किर्लोस्करांपर्यंत, 'पुराणकथा'च म्हणता येईल, अशा कथा रामावताराच्या वगैरे होत्या; परंतु देवलांनी पहिल्यांदा 'सामाजिक' विषय नाटकात आणला. ते नाटक- 'संगीत शारदा.' या नाटकाने मराठी रंगभूमीवर आणखी

एक क्रांती केली. पुराणकथेपासून बाजूला होत नाटक सामाजिकतेकडे वळू लागलं. मधल्या काळात अनेक लहान-मोठे नाटककार झाले. त्यांनी क्रमाक्रमाने सामाजिक विषयांचा उपयोग नाटकांच्या माध्यमातून केलेला दिसतो. 'संगीत शारदा' या नाटकाचा गाजलेला विषय म्हणजे- 'बाला-जरठ विवाह.' म्हणजे, वृद्ध पुरुष व तरुण मुलगी यांचा विषम विवाह आणि त्याचे होणारे दुष्परिणाम त्यात आले. इंग्रजोत्तर काळात सुधारणावादाचा मोठा प्रवाह आला. तो प्रवाह नाटकाच्या माध्यमातून जास्त विस्तारलेला दिसतो. सुरुवातीला जे लोकनाट्य होतं, त्यात अनेक कला एकत्रित असायच्या. त्यात विघटन होण्याची क्रमाक्रमाने सुरुवात झाली. सूत्रधार वेगळा झाला. त्याला आपण आता निर्माता म्हणतो. दिग्दर्शक वेगळा, गाणारा वेगळा, त्याचं दिग्दर्शन करणारे-वाद्यं वाजवणारे वेगळे. अभिनय करणारे नट-नटी वेगळे. नेपथ्य-केशभूषा-वेशभूषा करणारे वेगळे. अशा प्रकारे नाटकाच्या वेगवेगळ्या घटकांचं विघटन क्रमाक्रमाने झालं. ते कसं झालं याचाही विचार येथे विस्ताराने केलेला आहे.

त्यानंतरचे, विसाव्या शतकाच्या सुरुवातीचे महत्त्वाचे नाटककार म्हणजे, काकासाहेब खाडिलकर. त्यांनी आणखी एक पाऊल पुढे टाकलेलं दिसतं. संगीताशिवायही नाटक होऊ शकतं, नाटकात संगीत असायलाच पाहिजे, असं नाही. हे त्यांनी दाखवलं. म्हणून, 'कीचकवध' नावाचं नाटक त्यांनी संगीतविरहित करण्याचा प्रयत्न केला. कथानक पुराणातलंच होतं; पण त्याला दिलेला आशय समकालीन राजकारणाचा होता. त्याला 'प्रतीक-नाट्य' किंवा 'रूपकं' म्हणता येईल.पुराणकथेच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक-राजकीय विषय मांडण्याचं प्रतीक निर्माण केलं. 'भाऊबंदकी' अथवा कीचकवधासारखं नाटक असू दे; त्यातून समकालीन राजकारण, विचारप्रवाह मांडता येऊ लागले. ती त्यांची क्रांती होती. म्हणजे, पुराणकथा ही केवळ दैवतकथेभोवती गुंतून न राहता त्याचा अधिक विस्तार व विश्लेषण हे पुढच्या काळात खाडिलकरांपासून सुरू झालेलं दिसतं. त्यांची नाटकं राजकारणावरची रूपकं होती. ते लोकमान्य टिळकांचे अनुयायी होते. *केसरी*चे ते सुरुवातीचे संपादक

होते. खाडिलकरांची लेखनशैली व टिळकांची लेखनशैली बरीचशी मिळतीजुळती होती. त्यांनी टिळकांची राजकारणातली प्रतिमा नाटकांमध्ये आणण्याचं काम केलं. कीचकवधासारख्या नाटकात भारतभूमी ही जणू द्रौपदी आहे. तिला दास्यामध्ये ठेवलं आहे. इंग्रज हे तिला दास्यात ठेवणारे कौरव अशी प्रतीकं त्यांनी घेतली. ती स्पष्टपणे जाणवली. कीचक या उन्मत्त राजाच्या आश्रयाला पांडव आलेले असताना तो द्रौपदीकडे वाकड्या नजरेने बघतो आहे आणि भीम गदा घेऊन त्याला मारायला आला आहे. त्या वेळी कीचक सांगतो आहे की, 'कुणी आता मध्ये पडायचं कारण नाही. दास्य आहे तुमचं.' 'राज्यकर्ते ते राज्यकर्ते; दास ते दास.' हे वाक्य उच्चारल्याबरोबर प्रेक्षकांसमोर त्या काळातलं राजकारण उभं राहायचं. दास म्हटलं, की इंग्रज आपल्या भारतभूमीला दास्यात ठेवून तिचा छळ करतायंत असं द्रौपदीचं चित्र उभं राहायचं. आणि आक्रमक, छळ करणारा असं कीचकाचं चित्र उभं राहायचं. अशा प्रकारे निरनिराळी रूपकं-प्रतीकं त्या काळात खाडिलकरांच्या नाटकांतून आलेली आहेत. त्यामुळे त्याविषयी विस्ताराने लिहिलं गेलं आहे.

हा जो पौराणिक नाटकाचा पट आहे- विष्णुदास ते खाडिलकर- त्याची जी पार्श्वभूमी आहे, ती विधिनाट्यापासून ते विधिविरहित नाट्यापर्यंतचा प्रवास आहे. विधिनाट्य-लोकनाट्य, मग हळूहळू विष्णुदासांचं नाटक. विष्णुदासांचं नाटक आणि नवीन नाटक जोडणारा हा दुवा होता, असं म्हणता येईल. क्रमाक्रमाने विधीतल्या श्रद्धेपासून नाटक सुटत गेलं-दूर होत गेलं. नाटक ही स्वतंत्र रंजनप्रथा-कला म्हणून अस्तित्वात येऊन तिचा क्रमाक्रमाने विस्तार झाला. म्हणून, खाडिलकरांच्या नंतर वरेरकरांपर्यंत सामाजिक विषय मोठ्या प्रमाणावर आलेले दिसतात. एकच संहिता ही पात्रं, नाटककार वेगवेगळ्या काळांत निरनिराळ्या प्रकारे कसे सादर करत याची उदाहरणं या पुस्तकात दिली आहेत. विष्णुदासांनी पहिलं नाटक सादर केलं- 'सीतास्वयंवर आख्यान.' त्यात सीतेच्या स्वयंवराचं सरळसोट वर्णन केलं आहे. खाडिलकरांनंतर वरेरकर जेव्हा 'भूमिकन्या सीता' हे नाटक लिहितात, तेव्हा पुन्हा वेगळी

सीता येते. या सगळ्या कालखंडात रामाच्या चरित्रावर आख्यानं किंवा कथानकं मोठ्या प्रमाणावर आलेली दिसतात. हरिश्चंद्रालाही दास्यात ठेवलं होतं. हा जो पारतंत्र्याचा काळ आहे, तो प्रतीकात्मकरीत्या पौराणिक नाटकांतून सादर करण्याचा हा कालखंड आहे. विष्णुदास, किर्लोस्कर, देवल, खाडिलकर- येथपर्यंतचा १९२०पर्यंत(लोकमान्य टिळक यांचा मृत्यू)चा नाट्यप्रवास या पुस्तकात मांडण्याचा प्रयत्न केलाय. 'मिथक आणि नाटक' यांचा अनुबंध अनेक प्रकारांनी व्यक्त झालेला आपल्याला दिसतो. हा अभ्यास करताना अनेक विचारधारांचा, ज्ञानशाखांचा विचार करावा लागतो. म्हणून, हा अभ्यास एकंदरीने आंतर-ज्ञानशाखीय पद्धतीचा अभ्यास आहे. येथे गद्याचा, पद्याचा, भाषेचा, साहित्याचा, संगीताचा, अभिनयाचा, सामाजिक-राजकीय अभ्यास असे अनेक पैलू येतात. म्हणून, आंतर-ज्ञानशाखीय अभ्यासाचा हा एक नमुना होतो. 'मिथक आणि नाटक' या पुस्तकामध्ये हा विषय खूप विस्ताराने मांडला आहे. या पुस्तकामध्ये फक्त हे चार नाटककार डोळ्यांसमोर ठेवून त्यांची पार्श्वभूमी आणि क्रांतिकारकत्व मांडलेलं आहे. त्या काळाचं हे परिशीलन आहे.

विष्णुदासांचं नाटक क्रांतिकारक आहे, असं माझं म्हणणं आहे. अनेकांनी असं म्हटलं आहे की, 'विष्णुदासांनी नवीन काय केलं?' तर, विष्णुदासांनी एकच केलं की, विध्यात्मकतेतून नाटकाला बाहेर काढलं. जोपर्यंत विधीची श्रद्धा असते; धार्मिक श्रद्धा असते, तोपर्यंत त्याची चिकित्सा होऊ शकत नाही. विष्णुदासांनी नाटक श्रद्धेपासून तोडलं. म्हणून त्यांच्याच नाटकाची चिकित्सा होऊ लागली. त्यांच्याच नाटकावर टीका होऊ लागली. मला असं वाटतं की, विष्णुदासांचं कार्य येथे जास्त यशस्वी झालं. त्यांच्या नाटकाची टीका होणं, त्याला मागासलेलं नाटक मानणं हे नाटककला पुढे गेल्याचं लक्षण आहे. नाटकावर जेव्हा पुढे टीका होते, तेव्हा नाटकाने पुढे विकसनाचा मार्ग दाखवला, हे सिद्ध होतं.


१८५३पासून त्यांनी मुंबईला तिकीट लावून प्रयोग सुरू केले होते. १८६०च्या सुमारास, मुंबईच्या 'टेलिग्राफ ॲन्ड कुरिअर' नावाच्या

वृत्तपत्रात एका माणसाने विष्णुदासांच्या नाटकावर पत्र लिहिलं होतं, की- त्यांनी नवीन नाटक निर्माण केलं म्हणजे काय, ते आम्हास माहीत नाही. कोकणातल्या दशावतारी खेळासारखा हा खेळ होता. दशावतारी खेळ हा दशावतारासारखाच होता; परंतु दशावतार अजूनही धर्मश्रद्धेत बांधलेला आहे. विष्णुदासांनी मात्र ती श्रद्धा तोडली. त्याचा साचा दशावतारासारखा असला, तरी त्यातील अंतर्गत मूल्य रंजनाकडे जास्त झुकणारं आहे. पुढे सादरीकरणात विष्णुदासांनी खूप प्रयोग केले आहेत. त्यांचे चरित्रकार वासुदेवराव भावे - त्यांचे नातू- त्यांनी असं म्हटलं आहे की, विष्णुदासांनी नाटक 'रिॲलिस्टिक' कसं होईल, हे बघितलं. पुराणकथेत माणसं जास्त 'रिॲलिस्टिक' होऊ शकत नाहीत. ती त्या श्रद्धेत गुरफटलेली दिसतात. नाटकाच्या सादरीकरणातून श्रद्धाळूपण डोकावणार नाही, याची काळजी विष्णुदासांनी घेतली. कथानकाच्या बाबतीत मात्र अशी काळजी घेणं त्यांना शक्य झालं नाही. उदाहरणार्थ, गणपतीची सोंड जास्त बिजागऱ्या लावून वर-खाली होईल- ज्याला आज आपण कळतंत्र वा तांत्रिक गोष्टी म्हणतो, त्या आणल्या. वास्तववादी सादरीकरणाची रचना त्यांनी केली. श्रद्धेची चिकित्सा होत नाही. जेव्हा ती होते, तेव्हा श्रद्धाळू लोकांना ती आवडत नाही. विष्णुदासांनी त्या श्रद्धेतून नाटक मुक्त केलं आणि त्याला आधुनिक नाटकाकडे जाण्याची वाट मोकळी करून दिली. हे विष्णुदासांचं क्रांतिकारकत्व आहे. म्हणून पुढे किर्लोस्कर, देवल, खाडिलकर वगैरे नाटककार होऊ शकले. रंगभूमी विकसित झाली.

पौराणिक नाटकाच्या जंजाळातून रंगभूमी मुक्त झाली. पौराणिक नाटकाला विविध आयाम नंतरच्या नाटककारांनी दिलेत. हा एक मोठा स्वतंत्र विषय आहे. लोकनागर-रंगभूमी निर्माण झालेली दिसते. 'मिथक आणि नाटक' यांचा अनुबंध मांडण्याचा हा प्रयत्न आहे.

**- डॉ.तारा भवाळकर**

# पुस्तक-परिचय




## पंचगंगेच्या तीरावरून

**डॉ. जयसिंगराव पवार**

पृष्ठे : ६६८
किंमत : १४९९

**एका ज्येष्ठ इतिहास-संशोधक-लेखकाचं महत्त्वाचा दस्तऐवज ठरावं, असं आत्मचरित्र**

‘पंचगंगेच्या तीरावरून’ हे नामवंत ज्येष्ठ इतिहास-संशोधक डॉ.जयसिंगराव पवार यांचं आत्मचरित्र आहे. ‘तडसर’ या गावात त्यांचं बालपण व्यतीत झालं. शालेय शिक्षणही त्याच गावात झालं. त्यानंतर महाविद्यालयीन शिक्षणासाठी कोल्हापूरच्या राजाराम महाविद्यालयात त्यांनी प्रवेश घेतला. महाविद्यालयीन

शिक्षणादरम्यान ते कोल्हापूरच्या प्रिन्स शिवाजी बोर्डिंगमध्ये राहत होते. महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांना बराच संघर्ष करावा लागला. त्यांच्या घरी शेती होती; पण अनिश्चित उत्पन्नामुळे आर्थिक परिस्थिती ओढग्रस्तीची होती. त्यामुळे एम.ए.ला 'इतिहास' या विषयात विद्यापीठात प्रथम आल्यानंतर ते लगेच नोकरी शोधायला लागले. इथपर्यंतच्या प्रवासात शालेय शिक्षण, महाविद्यालयीन शिक्षणादरम्यानचे अनुभव ते तपशिलाने कथन करतात. या प्रवासातील त्यांचे गुरुजन, त्यांना भेटलेल्या व्यक्ती यांच्याबद्दल लिहितात. तसंच, त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी सांगताना त्यांचे आई-वडील, बहिणी, चुलते, त्यांचं आजोळ यांबद्दलही लिहितात.

प्राध्यापकाच्या नोकरीसाठी मुंबईला जाण्याचा विचार करत असताना शिवाजी विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ.आप्पासाहेब पवार यांनी त्यांच्यासमोर शिवाजी विद्यापीठात ते सुरू करणार असलेल्या मराठा इतिहास विभागात 'रिसर्च असिस्टन्ट' म्हणून येण्याचा प्रस्ताव ठेवला; पण तो विभाग सुरू होईपर्यंत काय, हा प्रश्न पवारांसमोर होता; म्हणून त्यांनी रामानंदनगरच्या कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी धरली. शिवाजी विद्यापीठात मराठा इतिहास विभाग सुरू झाल्यावर ते 'रिसर्च असिस्टन्ट' म्हणून तिथे रुजू झाले. त्या वेळी त्यांचे सहकारी होते- स.शं.देसाई आणि व.दी.राव. चार-पाच वर्षं 'रिसर्च असिस्टन्ट' म्हणून त्यांनी काम केलं; पण आयुष्यभर तेच काम करण्याची त्यांची इच्छा नव्हती. संशोधन आणि अध्यापन दोन्ही गोष्टी चालू राहायला पाहिजेत, असं त्यांना वाटायला लागलं. मग शिवाजी विद्यापीठातील रिसर्च असिस्टन्टची नोकरी सोडून ते कोल्हापूरच्याच जीकेजी कॉलेजमध्ये इतिहासाचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. काही काळ त्या महाविद्यालयात सेवा बजावून नंतर ते शहाजी छत्रपती कॉलेजमध्ये रुजू झाले आणि २००१मध्ये त्याच कॉलेजमधून निवृत्त झाले आणि निवृत्तीनंतरही आजतागायत त्यांचं इतिहास-संशोधन-लेखन सुरू आहे.

त्यांच्या यशस्वी व्यावसायिक जीवनाचा पट उलगडताना शिवाजी विद्यापीठात रिसर्च असिस्टन्ट म्हणून काम करतानाचे अनुभव, जीकेजी

कॉलेजमधील अनुभव आणि शहाजी छत्रपती कॉलेजमधील अनुभव ते कथन करतात. या संस्थांमध्ये काम करताना सहकाऱ्यांशी जुळलेले स्नेहबंध याबद्दलही ते लिहितात. त्यांचा इतिहास-संशोधन-लेखनाचा दीर्घ प्रवास या आत्मचरित्रातून उलगडतो. अनेक इतिहास परिषदा, व्याख्यानं, चळवळी, त्यांची पीएच.डी., शाहू महाराजांचा स्मारक ग्रंथ सिद्ध करून तो विविध देशी-विदेशी भाषांत पोहोचवण्याचं केलेलं काम, संभाजी स्मारक ग्रंथाचं काम, महाराणी ताराबाई यांचं चरित्र आणि छत्रपती राजाराम यांचं चरित्र इत्यादी अनेक ग्रंथांचं लेखन. दादाजी कोंडदेवांवर केलेलं संशोधन, त्यावर उठलेलं वादळ, जेम्स लेन प्रकरणात त्यांनी बजावलेली महत्त्वाची भूमिका इत्यादी महत्त्वपूर्ण तपशीलही उद्धृत केले आहेत.

व्यावसायिक जीवनाबरोबरच त्यांचं कौटुंबिक जीवनही उलगडत राहतं. त्यांच्या सुधाताईंशी झालेल्या विवाहाची हकिकत येते. त्यांच्या अपत्यांच्या जन्माचे उल्लेख येतात. त्यांच्या दोन्ही मुलींविषयीचे उल्लेखही येतात. त्यांच्या स्वत:च्या घराची गोष्ट येते. सेतुमाधवराव पगडी, वा.सी. बेंद्रे इत्यादी थोर इतिहास-अभ्यासकांचा त्यांना लाभलेला सहवास, त्यांच्या आठवणी ते नमूद करतात, एन.डी.पाटील, नागनाथअण्णा नायकवडी, कॉ.गोविंदराव पानसरे इत्यादी सामाजिक क्षेत्रातील धुरीणांबद्दलही त्यांनी लिहिलं आहे. चंद्रकांत-सूर्यकांत या मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनेता-बंधूंच्या आठवणी त्यांनी जागवल्या आहेत. मुकुंदराव किर्लोस्कर, सेतुमाधवराव पगडी प्रभृतींशी झालेल्या पत्रव्यवहाराचे तपशील त्या-त्या पत्रासहित उद्धृत केले आहेत.

या जीवनप्रवासाला छायाचित्रांचीही जोड दिली आहे. फुले-शाहू-आंबेडकर विचारसरणीने प्रेरित या व्यक्तिमत्त्वाच्या या आत्मचरित्रातून त्यांची जीवनगाथा उलगडतेच; पण त्या-त्या वेळची सामाजिक, राजकीय परिस्थिती, त्या-त्या वेळेला घडलेले महत्त्वपूर्ण प्रसंग इत्यादींचेही उल्लेख, तपशील येतात. त्यामुळे, हे आत्मचरित्र म्हणजे एक महत्त्वाचा दस्तऐवज ठरावा.

◆

## डॉ. जयसिंगराव पवार यांची साहित्यसंपदा


- आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध
- राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे
- राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे
- राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे
- राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा
- राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे
- शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे?
- शिवछत्रपती : एक मागोवा
- मराठेशाहीचे अंतरंग
- फ्रेंच राज्यक्रांती आणि बादशहा नेपोलियन
- छत्रपती संभाजी : एक चिकित्सा
- मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध
- समाज क्रांतिकारक राजर्षी शाहू छत्रपती
- क्रांतिसिंह नाना पाटील संपादक : डॉ. जयसिंगराव पवार
- पंचगंगेच्या तीरावरून
- वेध अमुच्या इतिहासाचा संपादक :
  डॉ.मंजुश्री पवार/डॉ.अवनीश पाटील
- छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ संपादक : डॉ. जयसिंगराव पवार
- व्यक्तिवेध : शरद पवार ते गोविंद पानसरे
- युवराज संभाजीराजे आणि सती गोदावरी
- शिवछत्रपतींची स्वराज्याची संकल्पना
- राजर्षी शाहू छत्रपती आणि सामाजिक न्याय
- दादाजी कोंडदेव कोण होता ?
- शाहू महाराजांच्या आठवणी

लेखक व संग्राहक : भाई बागल/संपादक : डॉ. जयसिंगराव पवार

- मराठ्यांचा इतिहास : खंड १ शिवशाही
- मराठ्यांचा इतिहास : खंड २ पेशवाई

## पुस्तकाच्या पानांतून

# शिवपत्नी महाराणी सईबाई




**डॉ. सुवर्णा नाईक-निंबाळकर**

पृष्ठे : १८८ / किंमत : २८०

*छत्रपती शिवरायांना सावलीसारखी सोबत करणाऱ्या आणि स्वराज्य घडणीच्या प्रवासात स्वतःच्या कौटुंबिक सुखाची तमा न बाळगणाऱ्या महाराणीचा लक्षवेधी जीवनप्रवास*

### फलटणचे नाईक निंबाळकर - सईबाई राणीसाहेबांचे माहेर

महाराष्ट्रातील अतिप्राचीन घराण्यांपैकी फलटणचे नाईक निंबाळकर हे घराणे असून, अस्सल कुळांपैकी हे

घराणे आहे. ह्यांचे मूळचे उपनाव पवार असे असून ह्यांचे मूळ पुरुष निंबराज पवार हे उत्तर हिंदुस्थानातील धारा नगरीमध्ये प्रसिद्ध होते. इ.स.पूर्व काळात वसिष्ठ ऋषींनी माऊंट अबू येथे यज्ञ केला होता. त्या यज्ञातूनच फलप्राप्ती म्हणून एक पुरुष प्रकट झाले. त्यांचेच नाव गुरुवर्य वसिष्ठांनी परमार असे ठेवले. आपले मूळ पुरुष परमार असल्याने आपले गोत्र वसिष्ठ व देवक धारेची तलवार आहे. उत्तर हिंदुस्थानात मुसलमानांच्या स्वाऱ्या होऊन यवनी अंमल संस्थापित झाल्यानंतर हे निंबराज दक्षिणेत आले. नंतर त्यांनी कुतूहल पर्वतानजीक अकरा वर्षांपर्यंत अरण्यात राहून देवीची आराधना केली. त्यांना देवी प्रसन्न होऊन 'तू व तुझे वंशज छत्रचामराधीश होतील,' असा वर मिळाला. तेव्हापासून त्यांनी बरेच द्रव्य मिळविले आणि काही लोक जमवून एक गाव वसविले. त्या गावास हल्ली 'निंबळक' अशी संज्ञा आहे. निंबराजांस दृष्टांत होऊन निंबवृक्षाखाली एक देवीची मूर्ती सापडली. ती उकरून काढून तेथे त्यांनी देवालय बांधले व तेथे त्या मूर्तीची स्थापना केली. त्या स्थानास हल्ली 'निंबजाई' म्हणतात. निंबराज पवार हे इ.स. १२९१ ह्या साली मृत्यू पावले, ह्यांचे वंशज निंबळक गावी राहत असत, म्हणून त्यांना 'निंबाळकर' असे उपनाव प्राप्त झाले.

निंबळक हे मूळ गाव फलटण तालुक्यात सातारा जिल्ह्यामध्ये आहे. सर्वसाधारणपणे हे निंबराज १०५०च्या दरम्यान राजा भोज यांच्या राजवटीच्या आसपास आले. मूळ पुरुष निंबराज यांच्या नावावरून गावाचे नाव निंबळक पडले. देवीचे नाव निमजाई (गडकालिका माता). थोडक्यात, परमार महाराष्ट्रात आल्यानंतर निंबाळकर हे आडनाव धारण केले. त्यानंतर वेगवेगळ्या ठिकाणी जवळजवळ तीनशे साडेतीनशे गावे निंबाळकरांची आहेत.

'सूर्यवंशी परमार राजघराण्यातील कुळात निंबोदा ऊर्फ निंबराज पवार या एका व्यक्तीने शिखर शिंगणापूरच्या शंभू महादेवाजवळील एका झाडाखाली अकरा वर्षे उग्र असे तप केले. नवचंडीच्या घटाची स्थापना करून, होम-हवन पूर्ण केले. त्यामुळे त्यांना देवी प्रसन्न होऊन तिने दर्शन दिले. देवी प्रसन्न झाल्यामुळे त्यांची सर्वदूर कीर्ती पसरली. निंबराज ह्यांस जगदेवराव ऊर्फ धारापतराव नावाचा फार पराक्रमी व शूर पुत्र होता. त्यांनी दक्षिणेत कित्येक मोहिमा करून पुष्कळ लूट मिळविली. त्यांच्या रणशौर्याची कीर्ती ऐकून महंमद तुघलक बादशहा याने त्यांना दिल्लीस नेले व आपल्या दरबारात सरदाराची जागा देऊन आपल्या पदरी ठेवले. पुढे बादशहाचे व दुराणी लोकांचे युद्ध झाले. ह्या युद्धात जगदेवराव हे इ.स. १३२७ साली मरण पावले. धारातीर्थी मृत्यू

पावल्यामुळे त्यांचे धारापतराव असेही नाव प्रसिद्ध झाले. जगदेवराव मृत्यू पावल्यानंतर महंमद तुघलक बादशहाने त्यांचा पुत्र निंबराज ह्यास निंबळक गाव व त्या सभोवतालाचा साडेतीन लक्षांचा मुलूख जहागीर करून दिला व त्यांना 'नाईक' हा किताब लिहून दिला. बादशहाने त्यांना दिल्लीतच राहण्याची विनंती केली; परंतु ती त्यांनी मान्य केली नाही. त्यामुळे जाताना बादशहाने निंबराज यांचा सर्व सरदारांसमक्ष सन्मान करून त्यांना वस्त्रे दिली व 'नाईक' हा किताब देऊन वतन व जहागीर, साडेतीन लक्षांची दिली. ही सर्व वतनाची चिन्हे, सनद त्यांनी घेतली. आपल्या वडिलांच्या मृत्युसमयी निंबराज हे दिल्लीत होते. नंतर बादशहाने दिलेल्या बहुमानाचा स्वीकार करून व बादशहाचा निरोप घेऊन निंबराज हे दक्षिणेत आले. दक्षिणेत येऊन ते आपल्या जहागिरीचा उपभोग घेऊ लागले. निंबराज यांनी आपले मूळचे निंबळक हे राहण्याचे ठिकाण सोडून बाणगंगा नदीच्या काठी ठाणपे या खेडेगावात नवीन गाव वसवून तेथे आपली राजधानी केली. निंबाजी हे आपले वडील जगदेवराव यांच्यासारखेच देवीचे सच्चे भक्त होते. त्यामुळे येथील देवीच्या दर्शनास ते रोज जात.


पुढे तीन वर्षांनी त्यांनी फलटणला येऊन वेशीवर तट बांधले. सर्व स्थिरस्थावर झाल्यानंतर त्यांच्याच पदरी असलेल्या चोथे व कुचे या लोकांनी निंबाळकरांचा सर्व खजिना लुटला. या सर्वांना निंबराज यांनी कैद केले. पुढे काही दिवसांतच निंबराज यांना पुत्र जाहला. त्या पुत्राचे नाव त्यांनी वणंगपाळ असे ठेवले. पुत्र झाल्याच्या आनंदात त्यांनी सर्व कैद्यांना बंधमुक्त केले. या बंधमुक्त झालेल्या कैद्यांनी बेदरच्या सुभेदारास आपलेसे करून घेतले. नंतर चोथे व कुचे या लोकांनी सैन्य जमवून सर्व नाईक लोकांना मारून टाकले. त्या वेळी नाईकांची तिसरी बायको जैवंताबाई ही ब्राह्मणी राज्यातील प्रसिद्ध मनसबदार कामराज घाटगे यांची मुलगी होती. या जैवंताबाईंना सहा महिन्यांचे मूल होते. आपले सहा महिन्यांचे मूल घेऊन जैवंताबाईंनी गुप्तपणे पळून जाऊन एका शिंप्याच्या घराचा आश्रय घेतला. तेथे राहून जैवंताबाईंनी काही लोकांच्या मदतीने आपल्या लहानग्या मुलास शत्रूच्या भीतीने जाळोली-काळोली येथील बाळोजी पाटील यांच्या घरी नेऊन ठेवले. पुढे त्या मुलाचा सांभाळ योग्य रीतीने करून त्याला चांगले संस्कार दिले. नंतर पुढे ते मूल मोठे झाल्यानंतर त्याने अनेक लोक जमवून गुप्तपणाने फलटणच्या बाजारात शिरून चोथे व कुचे यांचे सर्व लोक मारून टाकले व आपले राज्य परत मिळवले. हे वणंगपाळ स्वत: फार शूर योद्धे होते. त्यांनी सातपुड्यापर्यंत स्वाऱ्या करून भिल्ल लोकांच्या टोळ्या

फोडल्या होत्या. पुंड शिलेदाराचा मोड करून स्वत:ची जहागिरी त्यांनी परत मिळविली होती. सन १४०० मध्ये वणंगपाळ हे फलटणकर राज्य करू लागले. वणंगपाळाच्या राज्यकारभारामुळे फलटणमध्ये आनंदीआनंद झाला. लोकांनी वणंगपाळाला अनेक भेटी व नजराणे दिले. नंतर वणंगपाळ दिल्लीच्या बादशहास जाऊन भेटले. परत घेतलेले राज्य त्यांनी पराक्रमाने मिळवले म्हणून बादशहाला सर्व वृत्तान्त कथन केला. त्यानंतर बादशहाने त्यांना पोषाख व फर्मान देऊन राज्य करण्यास परवानगी दिली; परंतु पुढच्या दोनच वर्षांत पोटाच्या विकाराने ते मरण पावले. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे पुत्र (१४०० ते १४२०)मध्ये वणगोजी याने सर्व सूत्रे आपल्या ताब्यात घेऊन राज्य करण्यास सुरुवात केली. वणगोजी यांच्या डोळ्यांच्या पापण्या लांब होत्या, म्हणून त्यांना 'पलख वणगोजी' असे नाव पडले. पुढे वणगोजीने आपल्या राज्याचे उत्तम प्रकारे जतन केले. लोकांना कर्ज, तगाई देऊन शेतीला प्रोत्साहन दिले. शेती उत्तम प्रकारे पिकवली; परंतु पुढे दोन वर्षांनी दुष्काळ पडल्यामुळे सर्व लोक गाव सोडून निघून गेले, तरी तब्बल बारा वर्षे वणगोजीने दुष्काळाशी सामना केला. पुढे वणगोजी मृत्यू पावले. (१४२० ते १४३५) त्यानंतर त्यांचे पुत्र मालोजी राज्य करू लागले. त्यांच्या कार्यकाळातही सलग पाच वर्षे रयत दुष्काळाने हैराण झाली होती. मालोजींना पुढे क्षयाची लागण होऊन ते मृत्यू पावले. मालोजींच्या मृत्यूनंतर त्यांचे पुत्र बाजी नाईक हे गादीवर आले. बाजी नाईकांनी तेरा वर्षे राज्यकारभार केला. तेरा वर्षांनंतर भरपूर पाऊस पडला व वसूल भरमसाठ वाढला. आठ ते दहा वर्षे त्यांनी उत्तम प्रकारे राज्यकारभार केला. पुढे त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे पुत्र पवारराव नाईक यांनी आपले पित्याच्या मागे दहा वर्षे उत्तम प्रकारे राज्यकारभार चालवला. नंतर त्यांनी दिल्लीस जाऊन बहिलोल खानाची भेट घेतली. दिल्लीत बहिलोल खान व ऐवनपूरचा राजा यांच्यामध्ये युद्ध चालू होते. या युद्धात पवारराव नाईकाने मोठा पराक्रम करून बहलोल खानास विजय मिळवून दिला. बहलोल खान पवारराव नाईकांवर अत्यंत खूश होऊन त्यांनी वस्त्र, पोशाख देऊन त्यांचा मोठा बहुमान केला. पुढे पवारराव नाईकांना क्षयरोग झाला व फलटणला येऊन ते मृत्यू पावले. शके १५२७ मध्ये त्यांचे पुत्र दुसरे बाजी नाईक आपल्या वडिलांमागे राज्य करू लागले. दुसऱ्या बाजी नाईकांनी विजापुरचा युसूफ आदिलशहा यांची भेट घेतली. भेटीनंतर आदिलशहाने त्यांना स्वाराचे नायकत्व बहाल करून आपल्याकडेच ठेवून घेतले.

◆

## पुस्तकाच्या पानांतून

# सिकॅमोर रो




**जॉन ग्रिशॅम / अनु. सुदर्शन आठवले**

पृष्ठे : ६५२ / किंमत : ९९९

*एक मृत्युपत्र आणि भावनांचा कल्लोळ...*
*हबर्ड सेथ होता करुणेचा सागर*

सेथ हबर्ड यांनी ते जिथे सापडतील असं सांगितलं होतं, साधारण त्याच भागात ते सापडले, फक्त ते ज्या परिस्थितीत होते, ती मात्र अगदीच अनपेक्षित होती. ते जमिनीपासून सहा फूट उंचीवर, एका जाड दोराला लटकत होते, वाऱ्याच्या झोताने जरासे हलत होते. ते सापडले

त्यावेळी गार झोंबरे वारे वाहत होते आणि ते नखशिखांत भिजलेले होते. अर्थात हे काही त्या वेळी फारसं महत्त्वाचं नव्हतं. कुणी हेही लक्षात आणून दिलं असतं की खाली, जमिनीवर साचलेल्या चिखलात त्यांच्या बुटांच्या, ते चालल्याच्या किंवा इतर कोणी तिथे वावरल्याच्या, कोणाच्या हालचालींच्या कोणत्याही खुणा दिसत नव्हत्या, इतकंच काय, त्यांच्या बुटांनासुद्धा जराही चिखल लागलेला नव्हता. याचा अर्थ पाऊस सुरू व्हायच्या आधीपासूनच ते तिथे लटकत असावेत आणि त्यांचा जीवही गेलेला असावा; पण ही गोष्ट एवढी महत्त्वाची का होती? सरतेशेवटी ती नव्हतीच!

स्वत:ला स्वत:च झाडाला टांगून घेणं, हे काम काही साधं-सोपं नाही; पण सेथ यांनी त्याचा अगदी तपशीलवार अभ्यास केला असावा, याचे अनेक पुरावे उपलब्ध होते. ज्याला ते टांगलेले होते तो दोर होता अबाका नावाच्या वनस्पतीच्या तंतूंपासून बनवलेला, ज्याचं जगातील सर्वांत जास्त उत्पादन फिलिपाइन्सची राजधानी मनिला इथे होत असल्याने तिच्याच नावाने प्रसिद्ध असलेला 'मनिला रोप.' एक महिन्यापूर्वीच त्यांच्या डॉक्टरकडे ते गेले असताना त्यांनी स्वत:चं वजन केलं होतं आणि ते एकशेसाठ पौंड होते, तेव्हा दोराला तेवढं वजन सहन करायचं आहे, हे लक्षात घेऊन त्यांनी त्यातील साडेतीन इंच जाडीचा आणि खूप जुना त्यामुळे अधिक बळकट असाच दोर निवडला होता. पुढे सेथ यांच्या एका कारखान्यातील कर्मचारी अशी माहिती देणार होता, की त्याने या नाट्यपूर्ण प्रसंगाच्या एक आठवडा आधी त्याच्या मालकाला दोरखंडाच्या मोठ्या गुंड्यातून पन्नास फूट लांबीचा दोर कापून घेताना बघितलं होतं. दोराची एक बाजू त्याच झाडाच्या जराशा खालच्या भागातील एका फांदीला बांधलेली होती. घाईघाईत मारलेल्या पण भरपूर गाठींनी दोर चांगला घट्ट जखडून टाकलेला होता. दोराचं दुसरं टोक एका वरच्या फांदीवरून खाली सोडलेलं होतं. ती फांदी सणसणीत दोन फूट जाडीची होती आणि जमिनीपासून बरोबर एकवीस फुटांवर होती. तिथून दोर नऊ फूट खाली आला होता आणि त्याच्या दुसऱ्या टोकाला मान अडकवण्यासाठी फास तयार केलेला होता. त्याची गाठ ही फाशी देणारे मांग वापरतात तशीच 'खात्रीची', खास होती. सेथ यांनी ती मारताना सर्वतोपरी काळजी घेतलेली दिसत होती; कारण तो फास आणि ती गाठ हुबेहूब पुस्तकातल्यासारखी, तेरा वेढे घातलेली, त्यावर भार आला की खाली घसरून गळ्याभोवती आवळली जाणारी होती. फाशी देणारे अनुभवी,

तरबेज मांग फास आवळला गेल्याबरोबर विनाविलंब आणि विनासायास जीव जाईल अशीच गाठ बांधतात. सेथ यांनी तशीच गाठ मारली जावी यासाठी आधीपासून बराच सराव केलेला असावा. अशा सर्व, सहज नजरेला येणाऱ्या गोष्टींबरोबर आणखी एक निरीक्षण महत्त्वाचे होते - त्या सर्व प्रकारात झगडा, धडपड, प्रतिकार किंवा मरणप्राय शारीरिक वेदना यांच्या कोणत्याही खुणा नव्हत्या.

सहा फूट उंचीची एक शिडी कुणीतरी लाथाडून पाडल्यासारखी जवळच पडलेली होती. सेथ यांनी झाड निवडले, दोर बांधला, वरच्या फांदीवरून टाकला, मग ते शिडीवर चढले, त्यांनी गाठी मारून फास तयार केला, मान अडकवली आणि सर्वकाही व्यवस्थित झाले आहे अशी खात्री करून घेतल्यावर पायाखालची शिडी लाथाडून टाकली आणि शरीर खाली सोडून दिले. मानेभोवती फास आवळला गेला. त्यांचे दोन्ही मोकळे हात त्यांच्या बाजूला पॅन्टच्या खिशांजवळ निर्जीवपणे लोंबू लागले.

हे असंच सगळं घडलं असेल याबद्दल काही संशय होता का? काही निराळा तर्क? जेव्हा त्यांनी शिडी ढकलली आणि त्यांच्या पायाखालचा आधार सुटला तेव्हा त्यांचे हात मोकळेच होते. त्या हातांनी त्यांनी डोक्यावरचा दोर धरून गाठ सोडण्याची, मानेभोवतीच्या फासातून सुटण्याची धडपड केली असेल का? अखेरच्या क्षणी जीव वाचवण्याच्या आकांताने प्रयत्न केले असतील का? हे कोणालाच कधीच कळणार नव्हतं; पण तरीही अनिश्चितता होतीच. नंतर असा पुरावा मिळणार होता की ज्यावरून हे सिद्ध होणार होतं की सेथ अशा प्रकारचे व्यक्ती होते, जिला ती काय करते आहे याची पूर्ण जाणीव होती, ती व्यक्ती सर्वकाही समजूनउमजून करीत होती.

या अंतिम क्षणासाठी त्यांनी त्यांचा सर्वांत उत्तम सूट चढवला होता - लोकरीचा जरा जाडसा, गडद राखी रंगाचा, सहसा थंडीच्या दिवसात खास अंत्ययात्रेला जाताना घालण्यासाठी राखून ठेवलेला. तसे त्यांच्याकडे तीनच सूट्स होते. फासावर योग्य प्रकारे लटकले गेले की त्याचा परिणाम म्हणून शरीर चांगलेच ताणले जाते. त्यामुळेच की काय, सेथ यांच्या पॅन्टच्या खालच्या दुमडी त्यांच्या घोट्यापर्यंत वर सरकलेलल्या होत्या आणि कोट कंबरेपर्यंत वर गेला होता. त्यांच्या बुटांची पुढची निमुळती टोकं स्वच्छ आणि चकचकीत दिसत होती, निळ्या नेकटायची गाठ जराही बिघडलेली नव्हती. त्यांच्या

पांढऱ्याशुभ्र शर्टवर मात्र दोराच्या मधून पाझरलेल्या रक्ताचे डाग पडलेले होते. काही तासांतच ही गोष्ट माहीत होणार होती, की त्या दिवशी सकाळी अकरा वाजता सेथ हबर्ड जवळच्या चर्चमध्ये प्रार्थनेसाठी गेले होते. तिथे त्यांनी त्यांच्या ओळखीच्या लोकांबरोबर गप्पा मारल्या होत्या, तेथील पाद्री सेथ यांनी त्याला विनोद सांगून हसवल्याचेही सांगत होता. त्यांनी देणगीपात्रात पैसेही टाकले होते. एकंदरीत ते आनंदी दिसत होते, अगदी मोकळेपणाने वागत, वावरत होते. तेथील बहुतेक सर्वच लोकांना सेथ यांना फुफ्फुसाचा कर्करोग असल्याचं माहीत होतं; पण त्यांच्या डॉक्टरांनी त्यांना अल्प काळाचे आयुष्य असल्याची सूचना दिली होती, ही गोष्ट मात्र कोणालाही माहीत नव्हती. चर्चमध्ये ते अनेक वेळा त्यांच्यातर्फे प्रार्थना करायला सांगत; परंतु त्यांच्या आयुष्याला दोन घटस्फोटांचा कलंक होता आणि त्यामुळे ते 'खरा ख्रिश्चन' या पदवीला अपात्र होते.

त्यांच्या आत्महत्येमुळे तो डाग काही पुसला जाणार नव्हता.

ज्या झाडाला टांगून सेथ यांनी आत्महत्या केली होती ते, अनेक वर्षं सेथ आणि त्यांच्या कुटुंबाच्या मालकीच्या असलेल्या जमिनीवर माजलेल्या जंगलातील सिकॅमोरचं झाड होतं. तेथील बहुतेक सगळी झाडे ही फर्निचरसाठी वापरले जाणारे उत्तम लाकूड देणारी होती आणि सेथ त्यांचा वारंवार लिलाव करून त्या निसर्गधनातून भरपूर संपत्ती जमा करीत असत. ही जमीन सेथ यांच्या वडिलांनी १९३० साली काहीतरी लांडीलबाडी करून मिळवलेली होती. सेथ यांच्या दोन्ही घटस्फोटित बायकांनी पोटगीसाठी लढवलेल्या न्यायालयीन लढ्यात ही 'दुभती गाय' मिळवण्यासाठी जंग जंग पछाडले होते. त्या इतर बरंचकाही लुबाडून गेल्या; परंतु सेथ यांनी जमिनीवरील कबजा सोडला नाही.

आत्महत्यास्थळी सर्वांत पहिला प्रवेश झाला तो केल्व्हिन बॉग्जचा. केल्व्हिन हा सेथ यांच्याकडे अनेक वर्षं काम करणारा, त्यांचा खास विश्वासातला हरकाम्या गडी होता. त्या रविवारी सकाळी उजाडताउजाडताच केल्व्हिनला त्याच्या मालकाचा फोन आला, 'मला पुलाजवळ दुपारी दोन वाजता भेट.' सेथ यांनी त्याला अधिक काही सांगितलं नाही आणि केल्व्हिन मालकाला प्रश्न विचारणारा चाकर नव्हता. हबर्ड साहेबांनी अमुक एक गोष्ट सांगितली की ती बिनबोभाट करायची हा केल्व्हिनचा खाक्याच होता. तो निघाला त्यावेळी अखेरच्या क्षणी त्याच्या दहा वर्षांच्या मुलाने त्याच्याबरोबर येण्याचा हट्टच धरला. केल्व्हिनने त्याच्या अगदी मनाविरुद्ध मुलाला बरोबर घेतला. इतक्या

वर्षांच्या नोकरीत असं रविवारी दुपारी आणि तेही असं अचानक, काहीही कारण न सांगता त्याच्या मालकाने भेटीला बोलावलेलं त्याला मुळीच आठवत नव्हतं; म्हणूनच कित्येक मैलांच्या कच्च्या, खड्ड्याखड्ड्यांच्या रस्त्याने जाताना केल्व्हिन मनातल्यामनात त्या विचित्र, अपवादात्मक निरोपाबद्दल, भेटीमागील कारणाबद्दलच विचार करीत होता. त्याचे मालक गंभीर आजारी आहेत हे त्याला माहीत होतं आणि ते फार दिवसांचे सोबती नाहीत अशी अफवाही त्याच्या कानावर आली होती; परंतु केल्व्हिनचे मालक त्याला इतर काही सांगत नसत, तसं त्यांनी या बाबतीतही मौन पाळलं होतं.

पूल म्हणजे ज्याला नाव-गाव नाही अशा एका वेली वनस्पती, शेवाळ्याने भरलेला, क्वचितच पाणी दिसणाऱ्या नाल्यावरचा लाकडी साकव होता. हबर्ड गेले कित्येक महिने तो नाला स्वच्छ करून, त्यातील पाणी सिमेंटच्या पाइप्समधून सोडून, आत्ताचा लाकडी पूल पाडून त्याच्या जागी मोठा, रुंद, काँक्रीटचा पक्का पूल बांधण्याचं ठरवीत होते; परंतु त्यांच्या तब्येतीच्या सततच्या तक्रारींमुळे ते काम कायमच लांबणीवर पडत राहिलं होतं. त्या भागात तसं जंगलच माजलेलं होतं; पण पुलाच्या भोवतालची जागा मात्र झाडं तोडून मोकळी, साफ केलेली होती. त्या जागेत कधीतरी लोकवस्ती होती हे दर्शविणाऱ्या दोन मोडक्यातोडक्या झोपड्या अजूनही तिथे उभ्या होत्या.

पुलाच्या अलीकडे हबर्ड यांची जुन्या मॉडेलची कॅडिलॅक उभी केलेली होती. तिचं ड्रायव्हरच्या बाजूचं दार उघडं होतं आणि मागची डिकीही उघडी होती. ते पाहून केल्व्हिनने त्याचा ट्रक हबर्ड यांच्या गाडीच्या मागेच थांबवला. मालकाच्या गाडीची ही विचित्र अवस्था पाहून त्याच्या मनात अशुभाची पाल चुकचुकली. जे घडायला नको होतं असं काहीतरी घडलं होतं! पाऊस सतत पडतच होता आणि जोराचं वारंही सुटलं होतं. अशा परिस्थितीत गाडीचं दार आणि डिकी उघडी टाकून जाणं - मामला सरळ दिसत नव्हता. केल्व्हिनने त्याच्या मुलाला बाहेर न पडण्याची सक्त ताकीद दिली आणि तो त्याच्या छोट्या ट्रकमधून खाली उतरला. त्याने हबर्ड यांच्या गाडीभोवती, कोठेही स्पर्श होणार नाही, जे आहे त्यात काहीही बदल होणार नाही याची काळजी घेत एक फेरी मारली. गाडीत कोणीच नव्हतं, त्याच्या मालकाचा मागमूसही नव्हता. केल्व्हिनने एक दीर्घ श्वास घेतला, तोंडावरून हात फिरवला – तेव्हा आपल्याला घाम फुटला आहे हे ध्यानात येऊन त्याने तो पुसला आणि सभोवताली काळजीने शोधक नजर फिरवायला सुरुवात केली. समोरच्या मोकळ्या जागेच्या पलीकडच्या जंगलात, साधारण तीनशे फुटांवर एका झाडाला

एक मानवी आकृती टांगलेली त्याच्या दृष्टीस पडली. त्याने त्या दिशेने दोन पावलं टाकली... पण तो थबकला, त्याच्या ट्रकजवळ गेला, परत एकदा त्याने त्याच्या मुलाला जागेवरून न हलण्याविषयी बजावलं, सावधगिरी म्हणून त्याने ट्रकच्या दारांची कुलपंही लावली; परंतु उशीर झाला होता, त्याचा मुलगा विस्फारलेल्या डोळ्यांनी नको तिथेच - त्याच सिकॅमोरच्या झाडाकडे पाहत होता!

''हे बघ, इथेच बसून राहा.'' केल्व्हिन कठोर आवाजात मुलाला म्हणाला, ''ट्रकमधून अजिबात बाहेर पडायचं नाही, कळलं?''


मुलाकडून निश्चित होकार घेऊन केल्व्हिन त्या झाडाच्या दिशेने चालू लागला. चिखलात बूट घसरत होते आणि मन सारखं ठेचकाळत होतं. त्यामुळे तो मन आणि शरीर सावरतसावरत बेताबेतानेच चालत होता आणि आता तशी घाई करूनही काही उपयोग नव्हताच. तो जसजसा पुढे जाऊ लागला तसतसं समोरील दृश्य अधिकाधिक स्पष्ट होऊ लागलं. दोराला टांगलेला माणूस काळ्या रंगाच्या सुटात होता आणि त्याचा जीव जाऊनही बराच वेळ लोटला असावा. आणखी काही पावलांतच केल्व्हिनला ओळख पटली... ते त्याचे मालकच होते! बाजूला पडलेली शिडीही त्याला दिसली आणि समोरील दृश्याचा अर्थ आणि साधारण घटनाक्रम त्याच्या लक्षात आला. शक्य तितके तपशील मनात नोंदवून, कशालाही हात न लावता तो परत फिरला.

तो १९८८ सालातील ऑक्टोबर महिना होता. एव्हाना, वाहनातल्या फोनची सोय मिसिसिपीच्या भागात पोहोचलेली होती आणि तसला फोन केल्व्हिनच्या ट्रकमध्ये पाहिजेच हा सेथ हबर्ड यांचाच आदेश होता. तो ट्रकजवळ गेला, त्याने दार उघडून फोन उचलला आणि फोर्ड काउन्टीच्या शेरीफच्या ऑफिसचा नंबर फिरवला. फोन लागताच त्याने अगदी थोडक्या शब्दांत तिथे घडलेल्या प्रकाराचा वृत्तान्त दिला आणि नंतर स्टिअरिंगवर हात ठेवून तो शांत बसून राहण्याचा प्रयत्न करू लागला. ट्रकमधील हीटरमुळे निर्माण झालेलं उबदार वातावरण आणि रेडिओवर लागलेलं मर्ल हॅगार्ड या गायकाच्या गाण्याचे स्वर यामुळे जरा शांत झालेला केल्व्हिन समोरच्या काचेतून लयबद्ध हलणाऱ्या वायपर्सकडे एकटक पाहू लागला. त्याच्या मुलाच्या अस्तित्वाचंही त्याला भान नव्हतं. मुलगा घाबरला होता, भांबावला होता, अवाक् झाला होता. काही वेळाने त्याच्या लक्षात आलं, की तो मूकपणे रडतही होता!

◆

## पुस्तकाच्या पानांतून

# आय ऑफ द नीडल




**केन फोलेट** / अनु. **महेश कार्लेकर**

पृष्ठे : ३२८ / किंमत : ५५०

*एक जर्मन हेर आणि ब्रिटिश गुप्तहेर संस्था यांच्यातील थरारक संघर्षाचं उत्कंठावर्धक चित्रण*

या वर्षीचा हिवाळा गेल्या पंचेचाळीस वर्षांतील सर्वांत थंड हिवाळा होता. इंग्लंडच्या खेडे भागातील गावे बर्फामुळे एकाकी पडली होती आणि थेम्स नदी पूर्णपणे गोठली होती. जानेवारीत एके दिवशी ग्लासगोवरून लंडनला जाणारी ट्रेन ह्युलप स्टेशनला तब्बल चोवीस तास उशिरा पोहोचली.

बर्फ आणि ब्लॅकआउट (युद्धातील सक्तीचा अंधार) यामुळे गाडी चालवणे दुर्धर झाले होते. रस्त्यावरील अपघातात दुपटीने वाढ झाली होती आणि लोक विनोदाने एकमेकांना सांगत होते की, यापेक्षा शत्रूच्या प्रदेशात रणगाडे चालवणे जास्त सुरक्षित आहे.

जेव्हा वसंत ऋतूचे आगमन झाले, तेव्हा वातावरण आल्हाददायक झाले. जाहिरातीचे फुगे आकाशात उडू लागले आणि सुट्ट्यांवर आलेले सैनिक बिनबाह्यांचे ड्रेस घालून मुरडणाऱ्या पोरींना घेऊन फिरू लागले.

शहर काही युद्ध चालू असलेल्या देशाच्या राजधानीसारखे दिसत नव्हते. अर्थात, तशा थोड्याफार खुणा होत्याच आणि स्टेशनवरून आपल्या सायकलवरून घरी चाललेल्या हेन्री फेबरला त्या दिसत होत्या. महत्त्वाच्या ठिकाणांच्या बाहेर वाळूची पोती रचलेली होती, सार्वजनिक बागांमध्ये तात्पुरते निवारे उभारण्यात आले होते. जर जागोजागी हवेतून हल्ला सुरू झाला तर काय करावे याच्या सूचना लावलेल्या होत्या. फेबरने या सर्व गोष्टी पाहिल्या. एका साधारण रेल्वे कारकुनाच्या मानाने त्याची निरीक्षणशक्ती फारच तीक्ष्ण होती. बागेत बागडणारी मुले पाहून त्याला वाटले, युद्धाच्या त्या सूचना कोणी गांभीर्याने घेत नाही. जरी पेट्रोलवर बंधने असली तरी रस्त्यावर पुष्कळ गाड्या दिसत होत्या. जी माणसे काही महिन्यांपूर्वी बेरोजगार होती ती आता रात्रपाळीच्या कामावर जात होती. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ब्रिटनच्या ट्रेनमधून जाणारे सैन्य तो पाहत होता; तशीही सारी कागदपत्रे त्याच्याच कचेरीतून पुढे जात होती. अशा कागदांतून खूप माहिती मिळायची. आजच त्याने काही कागद हाताळले त्यानुसार भरपूर सैन्य एकत्र केले जात होते. त्याची खात्री होती की, एक लाखापेक्षा जास्त सैन्य गोळा केले जात आहे आणि ते फिनलँडच्या दिशेने निघाले आहे.

युद्धाच्या खुणा दिसत होत्याच; पण एकंदरीत लोक त्याचीही मजा घेत होते. रेडिओवरील कार्यक्रमात युद्धामुळे निर्माण झालेल्या टंचाईवरती विनोदी प्रहसने ऐकायला मिळत होती. हवाईहल्ल्यांसाठी बांधलेल्या खास जागांमध्ये गाण्यांचे कार्यक्रम होत होते आणि महागडे कपडे घातलेल्या स्त्रिया गॅसपासून बचाव करण्याचे मुखवटे फॅशन म्हणून घालत होत्या. मात्र, त्यांच्या तोंडी युद्धामुळे किती कठीण काळ आला आहे याच्या सुरस कहाण्या होत्या. एकाच वेळी कुठेतरी अगदी भव्य आणि कुठेतरी अगदी थिल्लर असे वातावरण होते

जणूकाही एखाद्या सिनेमाचे शूटिंग चालले आहे. आत्तापर्यंत तरी हवाईहल्ल्याच्या सर्व सूचना फुसक्याच निघाल्या होत्या.

फेबरचा दृष्टिकोन वेगळा होता... पण तो माणूसही सामान्य नव्हता.

त्याची सायकल घराजवळ पोहोचली आणि चढ चढण्यासाठी तो पुढे झुकून ती चालवू लागला. त्याचे लांब पाय एखाद्या इंजिनच्या पिस्टनसारखे हलत होते. जरी तो आपले खरे वय कोणाला सांगत नसला तरी प्रत्यक्षात तो एकोणचाळीस वर्षांचा होता आणि वयाच्या मानाने खूपच तंदुरुस्त होता. तशा बऱ्याच गोष्टी तो लपवायचा किंवा खोट्या सांगायचा; त्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ते गरजेचे होते.

वर पोहोचेपर्यंत तो घामाघूम झाला. तो ज्या इमारतीत राहत होता, ती लंडनमधील उंच इमारतींपैकी एक होती आणि म्हणूनच त्याने या घराची निवड केली होती. ते एक जुनाट दगडी घर होते. तशाच प्रकारची आणखी सहा घरे तिथे होती. उंच, चिंचचोळी आणि काळोखी, जशी तिथे राहणाऱ्या लोकांची मने होती. प्रत्येक घराला तीन मजले आणि शिवाय तळघर होते. नोकरांसाठी वेगळा दरवाजा होता. नोकर ठेवण्याची ऐपत नसली, तरी इंग्लिश लोकांना अशी सोय हवी असायची. फेबरला इंग्लिश लोकांच्या अशा मानभावीपणाचा तिटकारा होता.

सहा नंबरचे घर हॅरोल्ड गार्डनच्या मालकीचे होते. मंदीमुळे त्याची चहाची कंपनी बंद पडली आणि नादारी जाहीर करण्यापेक्षा त्याने मरण स्वीकारले. त्याच्यानंतर घराची मालकी त्याच्या विधवा पत्नीकडे आली, जिला घरखर्च भागवण्यासाठी भाडेकरू ठेवावे लागत होते. तिला घरमालकीण म्हणवून घ्यायला आवडायचे; जरी तिच्या मैत्रिणींच्या मते ती काही प्रतिष्ठित गोष्ट नव्हती. फेबरची खोली सर्वांत वरच्या मजल्यावर होती जिच्या एका भिंतीत मोठी खिडकी होती. फेबर तिथे सोमवार ते शुक्रवार राहायचा. त्याने मिसेस गार्डनला सांगितले होते की, शनिवार, रविवार तो आपल्या आईकडे एडिथला जातो. खरे म्हणजे ब्लॅकहीथ भागात त्याची आणखी एक घरमालकीण होती जी त्याला मि. बेकर म्हणून ओळखायची आणि तिच्या समजुतीप्रमाणे तो एक सेल्समन होता ज्याला पूर्ण आठवडा प्रवास करावा लागायचा.

त्याने सायकल बागेतील वाटेतून पुढे तळमजल्याच्या उंच खिडक्यांखालून नेली, शेडमध्ये ठेवून कुलूप लावून टाकले. कुलूप न लावता वाहन ठेवणे

हादेखील गुन्हा होता. शेडच्या चहूकडे बटाट्याची रोपे वाढत होती. युद्धकाळात मिसेस गार्डनने फुलबागेत भाजीपाला पिकवला होता.

फेबर घरात शिरला, त्याने टोपी खुंटीला लावली आणि चहा पिण्यासाठी किचनमध्ये गेला.

इतर तिघे भाडेकरू तिथे आधीच बसले होते. पहिला नुकताच वयात आलेला मुलगा ज्याला सैन्यात जायचे होते, दुसरा टक्कल पडू लागलेला सेल्समन आणि तिसरा एक सेवानिवृत्त नौदल अधिकारी होता जो फेबरच्या मते अंधत्वाकडे चालला होता. फेबरने सर्वांना अभिवादन केले आणि तो टेबलाशी बसला.

सेल्समन विनोद सांगत होता, ''विमानदलाचा अधिकारी वैमानिकाला म्हणाला, अरे, तू एवढ्या लवकर कसा परतलास?''

''मी त्या माहितीपत्रकांची बंडले सगळी एकाच ठिकाणी टाकून दिली, चालेल ना?'' त्यावर अधिकारी म्हणतो, ''अरे देवा... त्याच्याखाली कुणी मेले नसले म्हणजे ठीक.''

नौदल अधिकारी मोठ्याने हसला, फेबरने फक्त मंद स्मित केले. मिसेस गार्डन चहाची किटली घेऊन आल्या, ''गुड इव्हिंनग मि.फेबर, आम्ही तुमच्याशिवाय चालू केले, तुम्हाला राग नाही ना आला?''

फेबरने ब्रेडला लोणी लावले, सॉसेज घ्यावे की नाही याचा निर्णय होत नव्हता. ''तुमचे बटाटे पेरणीला तयार झालेले दिसतात,'' तो म्हणाला.

फेबरने आपली न्याहरी पट्कन उरकली. बाकीची मंडळी चेंबरलेनच्या ऐवजी चर्चिलला आणावे की नाही यावर वाद घालत होती. मिसेस गार्डन आपल्या बोलण्यावर फेबरचे काय मत आहे ते पाहात होती. ती थोडी जाड स्त्री होती, साधारणतः फेबरच्याच वयाची; पण कपडे मात्र तिशीच्या बाईसारखे घालायची. फेबरच्या मते तिचा दुसऱ्या लग्नाचा विचार चालू होता. तो अशा सगळ्या चर्चांपासून दूर राहायचा.

मिसेस गार्डनने रेडिओ चालू केला, थोड्या खरखरीनंतर तो चालू झाला; 'नमस्कार आपण बीबीसी ऐकताय, आज आपण पुन्हा त्या व्यक्तीविषयी बोलत आहोत....'

फेबरने हा कार्यक्रम आधी ऐकला होता. त्यात पम्प नावाच्या कथित जर्मन हेराविषयी बातमी असायची. त्याने बाकीच्यांची रजा घेतली आणि आपल्या

खोलीकडे निघाला.

मिसेस गार्डन रेडिओ शो संपल्यावर एकटीच बसून राहिली. सेल्समन त्या नौदल अधिकाऱ्याबरोबर बीअर प्यायला गेला, तरुण मुलगा थोडा धार्मिक विचारांचा होता, तो चर्चमध्ये गेला. तिने जीनचा एक ग्लास बनवला आणि बाल्कनीत बसली. तिच्या मनात फेबरचा विचार होता, हा एकटा आपल्या खोलीत का राहतो? तिला एका साथीदाराची गरज होती आणि फेबर तिच्या मते योग्य जोडीदार होता.

या विचारांनी तिला अपराधी वाटू लागले, ती आपल्या दिवंगत नवऱ्याचा विचार करू लागली. त्याच्या आठवणी ओळखीच्या; पण काहीशा धूसर होऊ लागल्या होत्या जणूकाही एखादा सिनेमा खराब फिल्ममुळे धुरकट दिसतो तशा. मि. गार्डन एक लहानखुरा यशस्वी माणूस होता. त्याला चारचौघांत प्रेम दाखवणे कधी जमलेच नाही आणि एकान्तात त्याला आवरणे कठीण होई, तिचे आपल्या नवऱ्यावर प्रेम होते. जर हे युद्ध पेटले तर तिच्यासारख्या आणखी बऱ्याच बायका विधवा झाल्या असत्या. तिने स्वतःसाठी आणखी एक ग्लास भरला.

मि.फेबर अगदी शांत माणूस होता आणि तीच एक अडचण नव्हती; त्याला कुठलेही व्यसन नव्हते, तो सिगारेट ओढत नसे, त्याच्या अंगाला कधीच दारूचा वास यायचा नाही. त्याची प्रत्येक संध्याकाळ आपल्या खोलीतल्या रेडिओवर अभिजात संगीत ऐकण्यात जात असे. वृत्तपत्र बारकाईने वाचणे आणि लांबवर फिरायला जाणे हेच काय ते त्याचे छंद होते. त्याची नोकरी जरी यथातथाच असली तरी जेवणाच्या टेबलावरील त्याची मते विचारपूर्वक मांडलेली असायची आणि त्याची बुद्धिमत्ता कळून यायची. त्याने प्रयत्न केला तर यापेक्षा खूप चांगली नोकरी मिळाली असती. बहुधा त्याची महत्त्वाकांक्षा कमी पडत होती.

त्याच्या दिसण्याच्या बाबतीतही काहीसे असेच होते. दणकट शरीरयष्टी, गर्दन आणि खांदे भरदार होते, त्याच्या अंगावर कुठेही चरबी नव्हती. कपाळ उंच, चेहरा करारी आणि निळे डोळे; अगदी सिनेमा नटासारखा नाही, तरी कुणाही स्त्रीला आवडेल असाच तो होता. त्याची जिवणी मात्र बारीक होती आणि त्यामुळे तो क्रूर भासायचा; मि.गार्डन त्या मानाने अगदी मवाळ माणूस होता.

आणि तरीही फेबरकडे कोणीही स्त्री परत वळून पाहात नसावी. त्याच्या कपड्यांना कधीही इस्त्री केलेली नसायची... तिने आनंदाने केली असती... पण त्याने कधी विचारलेच नाही.... तो नेहमी गबाळा रेनकोट आणि साधीशी

टोपी घालायचा. तो मिशी राखत नसे आणि दर पंधरवड्याला केस बारीक कापून येत असे. जणूकाही मुद्दामच आकर्षक न दिसण्याचा त्याचा प्रयत्न होता. तरीही त्याला स्त्रीचा सहवास हवाच असेल; लोक म्हणतात तसा तो नपुंसक तर नसेल ना? पण तो विचार तिने झटकून टाकला. त्याला एका चांगल्या सहचारिणीची गरज होती, जी त्याला स्मार्ट आणि महत्त्वाकांक्षी बनवेल आणि तिलाही एका जोडीदाराची गरज होतीच.

अर्थात, त्याने कधीच तसे दाखवले नव्हते. कधीकधी तर तिला त्याचा खूप राग यायचा, अगदी त्याच्या अंगावर ओरडून विचारवेसे वाटायचे, ''मी काय इतकी वाईट दिसते का? की, तू माझ्याकडे नुसते पाहातदेखील नाहीस?''

तिने स्वतःला आरशात पाहिले, तिचा चेहरा सुंदर होता, कुरळे केस आणि एका पुरुषाला आवडेल असे सर्व काही, तिला खुद्कन हसू आले, नकळत तिने जीनचा आणखी एक ग्लास भरला.

घोट घेताना तिच्या मनात विचार आला, मलाच पुढाकार घ्यायला हवा... फेबर मुलखाचा लाजाळू होता. त्याला शारीरिक ओढ नव्हती असे नाही, एक-दोनदा ती नाइट गाउनमध्ये असताना त्याच्या नजरेतून तिला ती जाणवली होती. तिला भीती वाटली की, आपण पुढाकार घेतला तर त्याच्याकडून कसा प्रतिसाद येईल; पण तसेही तिचे काय बिघडणार होते? जर तो नाही म्हणाला असता तर तिच्या स्वाभिमानाच्या ठिकऱ्या उडाल्या असत्या... पण त्या दोघांशिवाय झालेलं कोणाला कळणार होतं? त्यानंतर मात्र त्याला इथून जावं लागलं असतं.

नकाराच्या विचाराने तिचा उत्साह मावळला. ती सावकाशपणे उठली, मी अशी वागणारी बाई नाही... तिची झोपायची वेळ झाली होती. जीनच्या अजून एका पेगनंतर तिला छान झोप लागली असती. तिने बाटली उचलली आणि ती वरच्या मजल्यावर गेली.

◆

## पुस्तकाच्या पानांतून

# स्माइल प्लीज




**सुप्रिया वकील**

पृष्ठे : १४० / किंमत : २२०

*जीवनातले प्रसंग हलकेफुलके... चेहऱ्यावर आणतात स्माइल हलकेसे*

## सव्यसाची

''मॅडम, काय चाललंय सध्या? काय लिहिताय?'' पहिल्या प्रश्नाचं उत्तर देण्याच्या आत दुसरा-तिसरा... अशी प्रश्नांची सरबत्ती होते.

''अनुवादाच्या दृष्टीनं एक पुस्तक वाचतीये.''

''आता अनुवाद भरपूर झाले. आत्मचरित्र लिहा आता,'' अधिकारवाणीनं सल्ला येतो; पण हे तर फक्त हिमनगाचं टोक असतं. पाणी किती 'खोल' आहे, हे पाठोपाठ कळतंच. त्यावरच्या माझ्या उत्तराची वाट न पाहता प्रश्न येतो,

''तुम्ही डॉक्ल्यूवेन्गिस इझोक्ल्यूडॅल वाचलायत का?''

मी अपराधी चेहऱ्यानं आणि बावळटपणे ''नाही'' असं सांगते. मी हे नाव पहिल्यांदाच ऐकलेलं असतं, त्यामुळे ही बाई आहे का बुवा, ही व्यक्ती काय लिहिते, कोणत्या क्षेत्रातली आहे वगैरे गोष्टी मला माहीत असणं शक्यच नसतं.

मग त्या सल्लेकऱ्याच्या चेहऱ्यावर ''वाटलंच होतं!'' असे भाव उमटतात आणि तो, सध्या तो फक्त त्या डॉक्ल्यूवेन्गिसच्याच प्रेमात कसा आहे, त्याच्या विचारांनी कसा झपाटून गेला आहे आणि फक्त समग्र डॉक्ल्यूवेन्गिस वाचणं, हेच आता त्याचं कसं जीवनध्येय आहे. बाकी जगत् मिथ्या, हे सविस्तर सांगू लागतो, अर्थातच न विचारता... म्हणजे 'कोण डॉक्ल्यूवेन्गिस' हेही न विचारता आणि ते सांगू का, हेही न विचारता. आयुष्यात अंतिम सत्य गवसल्याच्या जाणिवेनं त्याचे डोळे चमकत असतात.

असे रसिकाग्रणी, कलासक्त, सर्जनशील, संवेदनशील, भारलेले, झपाटलेले, आस्वादक, स्पष्टवक्ते, सगळ्या गोष्टींवर मत अर्थातच आग्रही असणारे, आणि ते मत तावातावानं व स्वयंस्फूर्तीनं देणारे (व अर्थातच ते मत, तो विचार योग्य व बरोबरच आहे, याची खात्री असणारे) प्रतिभासंपन्न स्वयंभू, ही एक विशेष प्रजाती असते. आपल्या (व बहुधा त्यांच्याही) दुर्दैवानं आपली व त्यांची अधूनमधून गाठ पडते आणि त्यांच्या कुवतीचं व आवाक्याचं या जगात कुणीही नाही, या त्यांच्या समजुतीवर परतपरत खात्रीची मोहर उमटते. अशावेळी त्यांच्या चेहऱ्यावर 'परमेश्वरा, त्यांना क्षमा कर, त्यांना काडीची अक्कल नाहीये, त्यामुळे आपण काय करतोय, आपण काय आहोत, हे कळायचा प्रश्नच नाही,' असे भाव

उमटल्यासारखे वाटतात.

ही प्रजाती तशी बहुसंख्य नसली, तरी दुर्मिळही नसते. ही प्रजाती वयाच्या कोणत्याही टप्प्यावर (त्यांच्या व आपल्या) आपल्याला कुठेही, कधीही भेटू शकते; कारण यांचा वावर नाही, यांना ज्यातलं कळत नाही, असं कोणतंही क्षेत्र नसतं.

१९७२मध्ये पूर आला होता तेव्हा... गुलामसाहेबांची भाईंच्या घरची ती मैफल... त्या दिवशी बुवांचा अजिबात आवाज लागत नव्हता, मी म्हटलं त्यांना... मी तात्यांना तेव्हाच म्हणालो होतो. शान्ताबाईंना मी सांगितलंच होतं... त्याच्या चित्रात जो निळा रंग येतो ना... मी पहिल्यांदा शेरीची चव चाखली ती... मला तो फ्रेंच परफ्यूम अजिबात आवडला नाही... यांची ही धोरणं शेपूटघालू आहेत हो... राजकारणाचं मला सांगू नका... अरे, कळत नसेल, तर विचारा ना आम्हाला... मी होतोच ना त्या वेळी तिथे... अशा प्रकारे त्यांचा जो संवाद असतो, त्यातून त्यांचा सर्व क्षेत्रांतील सहज वावर लक्षात येऊ शकतो. संवाद म्हटलं की, तो दोन वा त्यापेक्षा जास्त माणसांमध्ये घडणं अपेक्षित असतं; पण ही प्रजाती तसली कुठली बंधनं, अपेक्षा वगैरे मानत नसावी. त्यांच्या दृष्टीनं संवादासाठी समोरची बाजू अजिबात महत्त्वाची नसते, म्हणजे मत व्यक्त करण्याच्या दृष्टीनं... ते काय सांगताहेत, ते ऐकण्यासाठी त्यांना दुसरी बाजू लागते एवढंच.

प्रचंड व्यासंग, विस्तृत आवाका, सर्व क्षेत्रांतील थोरा-मोठ्यांमध्ये ऊठबस, सडेतोड - स्पष्टवक्ता बाणा, रसिक जीवनशैली, विलक्षण मर्मज्ञता, प्रसिद्ध व्यक्तींचा एकेरी उल्लेख करण्याइतकी त्यांच्याशी घसट (असं हे सांगतात!), सर्व गोष्टींतील सूक्ष्मातिसूक्ष्म भेद जाणण्याची 'सुपरपॉवर', कुणावरही टीका करायला मागे-पुढे न पाहणारी अभ्यासू निडरता आणि स्वत:ला कलंदर समजायला व तसं म्हणवून घ्यायला खूप-खूप आवडणं, ही या प्रजातीची काही ढोबळ वैशिष्ट्ये म्हणता येतील. कुठल्याठी मीटिंग, परिषदा, मैफिली, कार्यक्रम, संमेलने, या ठिकाणी त्यांची हटकून हजेरी असते. अनेकांच्या अनेक गोष्टींचे ते साक्षीदार

असतात. त्यांच्या संग्रही अशा अनेक आठवणींचा व 'चीजां'चा खजिना असतो, जोडीला त्यांचे अभ्यासपूर्ण भाष्यही 'कॅरी फॉरवर्ड' होत असतेच.

कुठल्याही वयोगटातल्या स्त्री-पुरुष कुणाशीही आपण 'रिलेट' होऊ शकतो, अशी यांची समजूत असल्यामुळे ते युवकांशी त्यांच्या 'स्लँग' भाषेत बोलू शकतात, महिलांना त्यांच्या विशेष आस्थेच्या विषयांत मार्गदर्शन करू शकतात, तर लहान मुलांशी 'तुला सूर्याची पिल्लं दाखवू का?' असं म्हणत त्यांच्याशी सूर जुळवू पाहतात. त्यांनी सगळ्यांना ऐकलेलं असतं, वाचलेलं व पाहिलेलं असतं आणि यांना ज्यातलं कळत नाही, असा विषय तर, 'पैदा नहीं हुआ मामा...' अशी अवस्था असते.

मात्र, या प्रजातीला अशा 'संवादा'(!)साठी पूर्वी काही मर्यादा होत्या, त्यांच्या अभिव्यक्तीला पुरेसा वाव नसायचा आणि त्यांना जे ऐकवायचं आहे ते ऐकण्यासाठी अथवा 'शहाणे करून सोडावे सकळ जन' टाइपचा त्यांचा उद्देश साध्य करण्यासाठी त्यांना 'सावज' मिळावं लागायचं; पण सोशल नेटवर्किंग नामक जे जबरदस्त व्यासपीठ उपलब्ध झालंय, त्यामुळे आता त्यांना खुलं आकाश मिळालं आहे. आता त्यांच्या भावना तुंबून राहत नसाव्यात, त्यामुळे त्यांची मार्मिक (?) टिप्पणी, मर्मज्ञ रसिकता, सखोल विश्लेषणक्षमता दर्शवणाऱ्या पोष्टाचा रतीब ते आता नियमित घालू शकतात. कोणकोणत्या गोष्टींत काही अर्थ नाही, काय-काय भंपक आहे, हे ठाम खात्रीनं सांगू शकण्याची कुवत त्यांच्या ठायी असते.

प्रत्येक विषयात आपण बोललंच पाहिजे, असं या प्रजातीनं स्वतःला बंधन घालून घेतलेलं असावं, असं त्यांच्या प्रतिक्रियांवरून वाटतं. एवढंच नाही, तर मत व्यक्त न करणाऱ्या, नेमस्त अथवा एखाद्या गोष्टीला इतरही बाजू असू शकतील, असा विचार करणाऱ्या लोकांना ही प्रजाती टिपून-टिपून लक्ष्य करत असते. विरोध करण्याची किंवा खोडून काढण्याची निसटती जरी संधी मिळाली, तरी यांच्यात वीरश्री संचारते. यांचं आयुष्य जणू 'पौष्टिक' बनलेलं असतं, इतक्या ते पोष्टींवर पोष्टी टाकत सतत तळपत असतात.

आपण निर्मळ मनाचे, काही वेळा भाबडेसुद्धा, अतिशय तरल-

हळवे, त्याचबरोबर तटस्थ व सर्वंकष विचार करणारे आहोत, अशी त्यांची खात्रीची समजून असते व ही समजूत सार्वत्रिक करण्याचा त्यांचा अथक प्रयत्न असतो. रस्त्यावरच्या भटक्या कुत्र्यापासून ते दुर्मिळ फुलांपर्यंत, खिडकीतून येणाऱ्या कवडशापासून ते कोळशाच्या रेघोटीपर्यंत ते कशाचाही फोटो टाकून त्यासोबत आशयघन, अर्थसंपृक्त व गूढ काव्यात्म मजकूर लिहू शकतात. तो फोटोही कलात्मक 'अँगल'मधून त्यांनीच काढलेला असतो, हे वेगळं सांगण्याची गरज नाही. ही प्रजाती स्वयंभू असल्यामुळे तशी सहसा कधी दुसऱ्या कुणाची पोस्ट 'शेअर' वगैरे करत नाही. त्यांच्या 'पोष्टी ओरिजिनल'च असतात; पण समजा कधी त्यांनी काही 'शेअर' केलंच, तर त्यासोबत पानभर विरोध-पुरवणी किंवा ज्ञानप्रकटीकरणयुक्त-पुरवणी असणार, असं गृहीत धरायला हरकत नाही. हे लोक तडफदार, स्वतंत्र विचारांचे व जीवनाचं मर्म कळलेले लोक असतात. बरेचसे लोक यांना कणाहीन वाटतात; कारण माणसानं सतत कसं जाज्वल्य असलं पाहिजे, असं बहुधा त्यांना वाटत असावं.

सिनेमाचा इतिहास, जुनी गाणी, सरकार, धोरणं, आंतरराष्ट्रीय राजकारण, परराष्ट्र संबंध, निर्णय, योजना, आरोग्य, परंपरा, प्राचीन प्रथा, स्वातंत्र्य, अभिव्यक्ती, साऱ्यासाऱ्याचा इतिहास, नेपच्यूनवरील जीवसृष्टी ते बखरींचा इतिहास, नवं तंत्रज्ञान, रंगांचा शोध कधी लागला त्यापासून ते मोहरीच्या तेलाचा स्वयंपाकघरात वापर कधी सुरू झाला, इथपर्यंत कुठलीही गोष्ट, कुठलाही विषय त्यांना वर्ज्य नसतो. राजकारण वा त्याबाबतचा यांचा अभ्यास याबद्दल तर काय सांगावं! या माध्यमातून ते फक्त माहितीच पुरवत नाहीत, तर आवाहनंही करतात, उपहासात्मक भाष्य करतात व भाकितंही वर्तवतात.

यांनी पाहिलेलं नाही, असं कोणतंही ठिकाण नसतं. त्या स्थानाचा इतिहास-भूगोल सगळंकाही यांना अर्थातच माहीत असतं. यांनी चाखलेला नाही, असा कोणताही पदार्थ नसतो. त्याबाबतही त्यांच्या आवडीनिवडीची टिप्पणी असतेच. अमुक घडेल याचं भाकीत त्यांनी आधीच वर्तवलेलं असतंच (ही गोष्ट ते ती गोष्ट घडल्यानंतर सांगतात.) या

लोकांना प्रत्येक गोष्टीची 'ऑफ द रेकॉर्ड' बाजू खासकरून माहीत असते. समोर जे दिसतं त्याला खरं मानणाऱ्या अज्ञ बालकांच्या डोळ्यांवरची अज्ञानरूपी पट्टी दूर करण्याचं काम हे लोक मनोभावे पार पाडत असतात; पण कधी-कधी यांना सगळ्याचा वैताग येत असावा. आफ्टरऑल, इन्टेलेक्चुअल स्टार्व्हेशन, यू नो!

मग ते 'हा मी चाललो' अशा पवित्र्यात सर्वांना उद्देशून 'आमुचा रामराम घ्यावा' अशी पोस्ट उपहासपूर्ण (!) शब्दांत व्यथित मनानं लिहितात आणि 'अकाउन्ट डिॲक्टिव्हेट करून 'भिंती' आड जात असल्याचं जाहीर करतात. त्यांची अवस्था 'डबल धमाल' सिनेमातल्या स्वामी बाटानंद ऊर्फ बाटाभाईंसारखी होत असावी. मग ते ''इस पापी दुनिया को देखने का मन नहीं हैं।'' अशा त्राग्यानं बाजूला होतात. हे अर्थातच स्मशानवैराग्य असतं. तात्त्विक व हळव्या समर्थनांसह आणि मित्रपरिवाराच्या प्रेम व आग्रहाखातर ते पुन्हा उत्साहानं रुजू होणारच असतात, जनहितार्थ!

◆

# पुस्तकाच्या पानांतून

# थ्रिल्स




**महादेव मोरे**

पृष्ठे : १३६ / किंमत : २२०

*कथा गुन्हेगारांच्या... 'थ्रिल' अनुभवायला लावणाऱ्या*

## एक हास्य एक खून

दिवसभर आपल्या बंगल्यावर नौटंकीचं नाच-गाणं ऐकून अन् दारूच्या काही बाटल्या रिचवून तीसवर्षीय नबाबसाहेब महंमद नवाजखान काहीसे थकले-

वैतागलेले, त्यामुळे त्यांनी मैफल बर्खास्त केली आणि 'शमशादबाई' नावाच्या पंधरा वर्षांच्या आपल्या नव्या प्रेमिकेसह विश्रांतीसाठी बेडरूममध्ये निघून गेले... तेव्हा संध्याकाळचे केवळ पाच वाजले होते... नोव्हेंबर महिना, त्यामुळे अंधार लवकरच पडला, रात्र झाली. आपापली कामे आटोपून बंगल्यातील सारे नोकर आपापल्या खोल्यांत निघून गेले. चौफेर शांत-स्तब्ध अंधार पसरला; पण रात्री एक वाजता त्या शांततेला तडा पाडीत नबाबसाहेबांचा आवाज आला,

''महंमद हुसेनला बोलाव!!''

महंमद हुसेन हा नवाबसाहेबांचा जुना नोकर. तो सकाळीच नबाबसाहेब व शमशादबाईंसह लाहोरहून पश्चिम पंजाबमधील 'झंग' या शहरी आला होता. बंगल्यापासून काही अंतरावर नोकरांसाठी खोल्या बांधल्या होत्या. त्यांतील एका खोलीत तो गाढ झोपलेला, लाहोरहून येथवरचा प्रवास व दिवसभरचे काम, यामुळे तो पार मरगळून गेला होता. रात्री दहा वाजताच बेडरूममध्ये नबाबसाहेबांना त्याने जेवण नेऊन दिलं होतं, नि इकडे येऊन निघोरी झोपला होता, तोवर स्वयंपाकी 'गम्मन'नं त्याला उठवलं, जागं केलं न् म्हटलं,

''नबाबसाहेब बोलावत आहेत तुला.''

नशेत ते नेहमीच असे आपणाला बोलावतात, तेव्हा त्यात नवीन असं काहीच नव्हतं; पण ते एकटेच असले म्हणजे अशा हाका मारीत. पण आज तर शमशादबाईही बरोबर. लाहोरमध्ये त्यांनी तिला एका रात्रीसाठी सतराशे रुपये मोजले होते, अन् त्याचवेळी तिच्यावर मुग्ध होऊन आपल्या संस्थानात चलण्यास राजी करून घेतलं होतं...

झोपेतून अशा अपरात्री अचानक उठवलं गेल्यामुळे महंमद हुसेन अजून पूर्णत: जागा झाला नव्हता. तोवर बंगल्याचा चौकीदार गुरखा दलसिंहही तेथे पळतच आला नि त्यानेही 'गम्मन'चीच सूचना दिली,''नबाबसाहेब बोलावीत आहेत, हुसेन!''

'नक्कीच काहीतरी महत्त्वाचं काम असणार!' असा महंमद हुसेननेही विचार केला, अन् तो झटदिशी उठून गम्मन व दलसिंहबरोबर बंगल्याकडे

पळू लागला... तेवढ्यात बंगल्यात पिस्तूल झाडल्याचा आवाज ऐकू आला अन् तिघेही चमकले. घाबरले, थांबले... केवळ पिस्तूल झाडल्याचाच फक्त आवाज झाला होता, तोही नबाबसाहेबांच्या बेडरूममधूनच! पण तेथे काही गडबड ऐकू आली नव्हती, एखादा चीत्कारही उमटला नव्हता!

पिस्तुलाच्या आवाजाने क्षणभर बावचळलेला महंमद हुसेन दुसऱ्याच क्षणी सावध झाला, अन् त्वरेने बाथरूमच्या बाहेरच्या दरवाजाजवळ पोहोचला. बाथरूमचा आतला दरवाजा बेडरूमकडे उघडत होता, त्याने दरवाजावर धक्का दिला, पण तो आतून खुलाच, अन्लॉक्ड होता. तसाच बेडरूममध्ये उघडणारा दरवाजाही खुलाच होता. तो ढकलून तो बेडरूममध्ये शिरला. आतल्या बल्बच्या मंद प्रकाशात त्याला पुढील दृष्य दिसलं. नबाबसाहेब शमशादबाईंसह एकाच पलंगावर झोपलेले. त्यांचे डोळे मिटलेले. नबाबसाहेबांच्या बाजूलाच पलंगाखालच्या फरशीवर एक पिस्तूल पडलेलं, न् शमशादबाई थंडगार झोपलेली, अन् तिच्या डोकीखालची उशी रक्ताने थबथबून गेलेली.

परिणामी शमशादबाईचा खून करण्याच्या आरोपाखाली पोलिसांनी नबाबांना पकडून तुरुंगात डांबलं. तीन आठवडे उलटल्यावर 'झंग'च्या सेशन जज्जांनी त्यांचा जामीन मंजूर केला. पण अपराधाचं स्वरूप पाहून सरकारनं हायकोर्टाद्वारे तो जामीन रद्दबादल ठरवला. पण नबाबसाहेबांची ढासळती प्रकृती पाहून त्यांना तुरुंगाऐवजी सरकारी हॉस्पिटलमध्ये ठेवायची परवानगी दिली, अन् खरोखरच नबाबसाहेबांची प्रकृती फारच ढासळली होती. दारूचे गॅलनच्या गॅलन फस्त करायचे; शिवाय आणखी वारयोषितांचा नाद मग प्रकृती किती दिवस चांगली राहणार? बाई-बाटली ही वाईट व्यसनं त्यांना वडिलार्जित मिळालेल्या अफाट संपत्तीमुळे लागली होती. पंजाबचे त्यावेळचे शिक्षणंत्री श्री.फजल हुसेन यांच्या मुलीबरोबर विवाह झाला होता, पण पत्नीशी न पटल्यामुळे घटस्फोट घेऊन त्यांनी दुसरा विवाह केला होता, पण दुर्दैव असे की, थोड्याच दिवसांत ही दुसरी पत्नी मरण पावली, तसं मग त्यांचं उफाळणारं तारुण्य आवरणारं कुणी उरलंच नाही. मग रात्रंदिवस दारूच्या नशेत राहत. नाचींच्या बैठका झडत.

वारयोषितांचे तांडेच्या तांडे येत न् त्यांचा पैसा ओरबाडून निघून जात. त्यांना महिना पंचवीस हजारांचं मानधन 'पॉकेटमनी'साठी मिळे, पण तेवढ्यानेही त्यांचा महिन्याचा हा असा अफाट खर्च भागेना. तेव्हा त्यांनी आपला जमीनजुमला विकायला सुरुवात केली आणि त्यामुळेच त्यांच्यात व त्यांचा चुलत भाऊ महंमद नवाज यांच्यात वितुष्ट आलं. नबाबसाहेबांना मूल वगैरे नसल्यामुळे त्यांच्या पश्चात महंमद नवाजच साऱ्या संपत्तीचा मालक होणार होता. त्यामुळे शमशादबाईच्या खुनाचा खटला जेव्हा कोर्टात सुरू झाला तेव्हा नबाबसाहेबांनी आपल्या याच चुलत भावावर खून केल्याचा आरोप ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या जबाबात सांगितले,

''गेल्या अडीच वर्षांपासून महंमद नवाजशी माझे संबंध बिघडले होते; कारण मला मूलबाळ काहीच नसल्याने तो स्वत:ला माझ्यामागे माझ्या साऱ्या मालमत्तेचा वारस समजत होता... पण ह्या वेळपर्यंत मी तर दोन-तीन लाखांची मालमत्ता विकून टाकली होती... अर्थात हे त्याला कसं सहन व्हावं...?

''त्या दुर्घटनेच्या दिवशी रात्री दहापर्यंत मी सारखा दारू पीत होतो. नंतर मी शमशादबाईसह झोपी गेलो. खोलीतील दिवा विझवला; पण बाथरूम वगैरेचे दरवाजे आतून बंद न करता नुसतेच पुढे ढकललेले होते...

''खरोखर मी अगदी नशेत झोपी गेलो होतो. नंतर किती वाजता कोणास ठाऊक? पण खोलीत काही गडबड मला ऐकू आली न् मी जागा झालो आणि मी महंमद हुसेनच्या नावाचा पुकारा केला... आणि मग पिस्तूल झाडल्याचा आवाज मला ऐकू आला... पण... पण हल्ला करणारा माणूस त्वरित पळून गेला होता आणि शारीरिक अशक्तपणामुळे व नशेमुळे मी त्याला पकडू शकलो नाही, तर तसाच पलंगावर पडून राहिलो.''

लाहोरचे सेशन जज्ज मि.फालशा यांच्या कोर्टात खटला चालला होता. तो जर 'झंग' गावी चालवला असता तर आपल्या अधिकाराचा व पैशाचाही दबाव आणून नबाबसाहेबांनी साक्षीदार फोडले असते...

स्वत:ला निरपराध ठरवत नबाबसाहेब पुढे म्हणाले,

''...आणि मला स्वत:ला शमशादबाईचा खून करण्याचं काय कारण होतं? ती तर मला फारच आवडत होती. शिवाय तिला मी बरेच पैसे दिले होते, आणि एक मौल्यवान अंगठीही. खरं तर मी तिच्याशी लग्नच करणार होतो, आणि याच हेतूने मी तिला लाहोरहून आपल्याबरोबर 'झंग'ला आणली होती...''

''पण तुम्ही सकाळी दहा वाजेपर्यंत त्या प्रेताला मिठी मारून का पडून राहिलात?'' सरकारी वकिलाने विचारले.

''माझे 'झंग'मधील वकील लाला मनोहरलाल यांनी तेव्हा मला असा सल्ला दिला की, 'तुम्ही आपल्या जागेवरून हललात तर मेलातच!' हे ऐकून मी बेशुद्ध पडलो.

गोष्ट तशी सरळ साधी होती अन् शमशादबाईचा खून न करण्याचं कारणही अगदीच निरागस होतं. बेडरूमचे दरवाजे तर नुसतेच पुढे ढकललेले होते आणि नबाबसाहेबांचा कायदेशीर वारस बाहेरील टेंटमध्ये झोपला होता तर त्या कायदेशीर वारसाने-चुलत भावाने, आपल्या साक्षीत असं सांगितलं–

'नबाबसाहेब आपली उरलीसुरली मालमत्ताही आपल्या वाईट नादासाठी फुंकून टाकू लागले होते, आणि मी त्यांचा कायदेशीर वारस असल्याने मला हे सारं मुळीच पसंत नव्हतं. याबाबत मी स्थानिक वकील श्री.लाला मनोहरलाल यांचा वेळोवेळी सल्लाही घेत असे आणि त्यामुळेच मी आमची मालमत्ता खरेदी करणाऱ्या इच्छुकांना दैनिकातून जाहीर ताकीद दिली होती की, 'आमची मालमत्ता विकत घेणं किंवा विकणं हे कायद्याच्या विरुद्ध आहे...'

''पण खुनाची बातमी कळताच तुम्ही झटकन बेडरूममध्ये का गेला नाहीत?''

''मी मुद्दामच बेडरूममध्ये गेलो नाही, कारण नबाबसाहेबांशी माझे संबंध बिघडलेले असल्यामुळे माझ्यावरदेखील एखादं बालंट येईल, ही भीती वाटत होती...''

नबाबसाहेब व महंमद नवाज या दोघांशिवाय त्यांचा जुना नोकर महंमद हुसेन, सैपाकी गम्मन व चौकीदार दलसिंह यांच्याही साक्षी झाल्या. शमशादबाईंचा भाऊ तालिब हुसेन यांचीही एक साक्ष झाली. ताबिल हुसेन लाहोरहून आपल्या बहिणीसह 'झंग'ला आला होता, अन् दुर्घटनेच्या त्या रात्री स्वयंपाकी गमनजवळ झोपला होता. त्यानं आपल्या साक्षीत सांगितलं, 'माझी बहीण नबाबसाहेबांच्या सहवासात आनंदी होती. दुर्घटनेच्या रात्री आठ-नऊ वाजण्याच्या दरम्यान ती मला भेटली. मग आम्ही दोघे मिळून जेवलोही. जेवतानाही माझी बहीण खुशीतच होती. नबाबसाहेबांनी आज सतरा-अठराशे रुपये दिलेले आहेत, 'जेवता-जेवता तिनं सांगितलं न् मग ती त्यांच्या बेडरूममध्ये निघून गेली.'

खैरा व जोहरा नावाच्या 'झंग'मधील दोन वारयोषितांच्याही साक्षी झाल्या. दुर्घटनेच्या दिवशी त्या दोघी नबाबसाहेबांच्या बंगल्यावर नाच-गाण्यासाठी गेल्या होत्या. त्यांनी आपल्या साक्षीत सांगितलं, 'नबाबसाहेबांनी त्या दिवशी शमशादबाईलाही गाणं म्हणण्यास सांगितलं; पण तिनं साफ नकार दिला. तेव्हा नबाबसाहेब तिच्यावर फार रागावलेही...'

उलटतपासणीत नबाबसाहेबांनी या गोष्टीचा साफ इन्कार करून सांगितले, 'त्या दिवशी शमशादबाईवर मी मुळीच रागावलो नव्हतो!'

नबाबसाहेबांचा नोकर महंमद हुसेनची साक्ष सर्वांत दीर्घ व महत्त्वपूर्ण होती. त्यानं सांगितलं, ''आपल्या हृदयाच्या आजारावर औषधपाणी करण्यासाठी २३ ऑक्टोबर १९४१ रोजी नबाबसाहेब लाहोरला गेले. सोबत मीही होतो. तेथील 'प्लेटी हॉटेल'मध्ये आम्ही राहिलो होतो. तेथे शमशादबाई वरचेवर येई. ६ नोव्हेंबरची अख्खी रात्र तिनं नबाबसाहेबांच्या खोलीतच घालवली. नबाबसाहेबांनी तिला सतराशे रुपये दिले अन् मुलतान जिल्ह्यातील 'खानबहादूरगढ' या आपल्या गावी चलण्याचा प्रस्ताव तिच्यापुढे ठेवला. ती या गोष्टीला त्वरित कबूल झाली. ७ नोव्हेंबरच्या रात्रीच्या गाडीने आम्ही सर्व मुलतानकडे निघालो. आम्हांबरोबर आणखी दोन नोकर व शमशादबाईचा भाऊ तालिब हुसनेही होता. नोकरांशिवाय

अन्य सर्वांनी पहिल्या वर्गाच्या डब्यातून प्रवास केला. ८ नोव्हेंबरला सकाळी आमची गाडी 'खानेवाल' स्टेशनवर थांबली. तसं नबाबसाहेबांनी सांगितलं की, 'आपली प्रकृती चांगली नाही, तेव्हा 'मुलतान' ऐवजी 'झंग'लाच सध्या आपण जाऊ! मग 'खानेवाल'ला गाडी बदलून आम्ही सारे दुपारी २।। वाजता 'झंग'ला पोहोचलो. तिथं आम्हांस समजलं की, नबाबसाहेबांच्या बंगल्यात त्यांचा चुलत भाऊ महंमद नवाज राहत आहे. नबाबसाहेब आल्याचे पाहून महमद नवाजने त्वरित बंगला खाली केला, अन् बंगल्याच्या कंपाउंडमध्ये स्वत:साठी एक तंबू ठोकला. नबाबसाहेब प्रमाणाबाहेर दारू पीत असत आणि त्या दिवशी तर 'खानेवाल' स्टेशन सोडल्यापासून त्यांनी प्यायची रिप्पी लावली होती. ते रात्री १० पर्यंत सारखे पीतच होते. चार-पाच रिकाम्या बाटल्या बाथरूममध्ये जमा झाल्या, तरीही आणखी एक भरलेली बाटली बेडरूममध्ये शिल्लक होतीच. ९ नोव्हेंबरपासून नबाबसाहेबांच्या आईसाहेबांनी मला नोकरीवरून कमी केलं. महंमद नवाज व लाला मनोहरलाल यांच्यासह मी पोलीस ठाण्यावर जाऊन खुनाची बातमी दिली. हे कारण कदाचित त्यामागे असेल...''

या सर्व साक्षी-पुराव्याच्या आधारावर सेशन जज्जांनी आपल्या चार मदतनिसांचा सल्ला विचारला... खुनाचा काहीही उद्देश दिसून येत नाही, तसेच स्पष्ट असा पुरावाही मिळालेला नाही. तेव्हा नबाबसाहेबांना सोडून द्यावं, असं त्या चौघांनीही आपलं मत सांगितलं. पण जज्जसाहेबांना ते न पटल्यानं त्यांनी त्या मताचा स्वीकार केला नाही, तर त्यांनी विस्तारपूर्वक खुनाच्या सर्व संभाव्य घटनांवर प्रकाश टाकून चार महत्त्वपूर्ण मुद्दे उपस्थित केले-१) आरोपीने हा खून जाणीवपूर्वक केलेला आहे. २) एखाद्या अज्ञात व्यक्तीने बेडरूममध्ये प्रवेश करून आरोपीवर किंवा शमशादबाईवर गोळी झाडली, ३) शमशादबाईने आत्महत्या करून घेतली. ४) केवळ अजाणता आरोपीच्या हातून गोळी झाडली गेली.

◆

## **१६ मार्च ते १५ एप्रिल २०२६ दरम्यानचा दिनविशेष**

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५० टक्क्यांपर्यंत सूट

### **खालील संचांवर १६ ते ३१ मार्च दरम्यान खास सवलत**

**१६ मार्च - झोई जेनी यांचा जन्मदिन**

'आकाश बदलताना' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-**

**१७ मार्च - बाळ भागवत यांचा जन्मदिन**

'देव? छे! परग्रहावरील अंतराळवीर!' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२८/-**

**१७ मार्च - फ्रँक गिलब्रेथ यांचा जन्मदिन**

'चीपर बाय दी डझन' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १५८/-**

**१८ मार्च - पेरुमाल मुरुगन यांचा जन्मदिन**

'अर्धनारी', 'धग', 'नदीमुख', 'एकाकी सुगी', 'कंगनम्', 'खोल खोल पाणी', 'सरण' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २५०५/- । सवलत किंमत २००४/-**

**१९ मार्च - आयर्विंग वॅलेस यांचा जन्मदिन**

'सेकंड लेडी', 'द गेस्ट ऑफ ऑनर', 'द मिरॅकल', 'द सेव्हन्थ सिक्रेट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १२४५/- । सवलत किंमत ६९७/-**

**२० मार्च - विल्यम डॅलरिंपल यांचा जन्मदिन**

'व्हाइट मुघल्स', 'रिटर्न ऑफ अ किंग', 'अराजक' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १८४०/- । सवलत किंमत १३८०/-**

**२२ मार्च - सुभाष दांडेकर यांचा जन्मदिन**

'चाळिशीनंतरची वाटचाल' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १५०/-**

**२३ मार्च - डॉ. डेव्हिड जे. श्वार्त्झ यांचा जन्मदिन**
'द मॅजिक ऑफ थिंकिंग बिग', 'द मॅजिक ऑफ थिंकिंग सक्सेस', 'द मॅजिक ऑफ गेटिंग व्हॉट यू वॉन्ट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८९०/- । सवलत किंमत ५८०/-**

**२५ मार्च - व.पु.काळे यांचा जन्मदिन**
व.पु.काळे यांच्या सर्व पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १०३१५/- । सवलत किंमत ७६३३/-**

**२५ मार्च - टॉम मोनाघन यांचा जन्मदिन**
'पिझ्झा टायगर' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४२०/- । सवलत किंमत २३१/-**

**२६ मार्च - राहुल गोखले यांचा जन्मदिन**
'विज्ञानातील सरस आणि सुरस' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत ११०/-**

**२६ मार्च - व्हिक्टर फ्रॅन्कल यांचा जन्मदिन**
'अर्थाच्या शोधात' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १५८/-**

**२६ मार्च - राजशेखर हिरेमठ यांचा जन्मदिन**
'मराठी व्याकरण परिचय' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ८९/-**

**२६ मार्च - उमेश कदम यांचा जन्मदिन**
'एक होता मित्र', 'केवळ मैत्रीसाठी', 'संहार', 'उद्ध्वस्त', 'स्थलांतर', 'झांझिबारी मसाला', 'अमानुष', 'इथिओपियी सुरस कथा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १७८०/- । सवलत किंमत ११९३/-**

**२९ मार्च - डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचा जन्मदिन**
'शेतकऱ्याचा असूड : महात्मा जोतीराव फुले' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९६/-**

**२९ मार्च - विवेक शानभाग यांचा जन्मदिन**
'घाचर घोचर' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

**३० मार्च - मणी भौमिक यांचा जन्मदिन**
'परमेश्वर : एक सांकेतिक नाव' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १६०/-**

**३० मार्च - फिलिप गूल्ड यांचा जन्मदिन**
'आयुष्याचा अंतिम संस्कार' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत ११९/-**

**खालील संचांवर १ ते १५ एप्रिल दरम्यान खास सवलत**

**१ एप्रिल - सुधा पाटील यांचा जन्मदिन**
'बाल परिचर्या' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ५९५/- । सवलत किंमत ३५७/-**

**१ एप्रिल - सुरेश वसंत नाईक यांचा जन्मदिन**
'कविता दोघांची...', 'या सुखांनो' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ४८५/- । सवलत किंमत २९२/-**

**३ एप्रिल - किशोर पवार यांचा जन्मदिन**
'आपली सृष्टी' मालिकेतील १० पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ११००/- । सवलत किंमत ७९९/-**

**४ एप्रिल - सौरभ दुग्गल यांचा जन्मदिन**
'आखाडा' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १३९/-**

**५ एप्रिल - जोसेफ लेलिव्हेल्ड यांचा जन्मदिन**
'महात्मा गांधी आणि त्यांचा भारतीय संघर्ष' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत २९९/-**

**५ एप्रिल - व्यंकटेश माडगूळकर यांचा जन्मदिन**

व्यंकटेश माडगूळकर यांच्या ४२ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७३८५/- । सवलत किंमत ५३१७/-**

**७ एप्रिल - जागतिक आरोग्यदिन**

**संच १ -** 'आरोग्यासाठी योग', 'चला जाणून घेऊ या! शाकाहार', 'चिकन सूप फॉर द सोल अस्थमा', 'चिकन सूप फॉर द सोल बॅक पेन', 'हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र', 'हृदयविकार निवारण', 'चाळिशीनंतरची वाटचाल', '२० मिनिटे तंदुरुस्तीसाठी', 'डॉक्टरांकडे जाण्यापूर्वी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १७२०/- । सवलत किंमत ११२२/-**

**संच २ -** 'फिट फॉर ५०+ फॉर मेन', 'फिट फॉर ५०+ फॉर विमेन', 'रूप करा सुरूप', 'गर्भसंस्कार' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ९६०/- । सवलत किंमत ६७२/-**

**संच ३ -** 'द जॉय ऑफ कॅन्सर', 'कॅन्सर रोखू या एका सजग जीवन-शैलीसह', 'भारताच्या लस-निर्मितीतील प्रगतीची गोष्ट', 'स्व-जाणिवेतून स्वास्थ्यप्राप्ती', 'धन्वंतरी घरोघरी', 'संजीवनी उच्च तंत्रज्ञानाची', 'उपचार तन-मनाचे', 'बेटर'
**संचाची मूळ किंमत २४७०/- । सवलत किंमत १७२९/-**

**७ एप्रिल - अतुल कहाते यांचा जन्मदिन**

'ॲडॉल्फ हिटलर','अमेरिकी राष्ट्रपती', 'अंतराळ स्पर्धा','हिलरी क्लिंटन', 'रुपेरी सिंधू', 'शेअरबाजार', 'स्टीव्ह जॉब्ज : एक झपाटलेला तंत्रज्ञ!', 'वॉरन बफे', 'वॉरन बफेच्या यशाचे ५० मंत्र', 'गुंतवणूक भान', 'बेंजामिन ग्रॅहॅम', 'ॲलन ट्युरिंग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ४०७५/- । सवलत किंमत ३१९६/-**

**८ एप्रिल - रणजित देसाई यांचा जन्मदिन**

रणजित देसाई यांच्या ४२ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८२२५/- । सवलत किंमत ६२३९/-**

**१० एप्रिल - वर्षा अडालजा यांचा जन्मदिन**

'अणसार' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २०९/-**

**१० एप्रिल - एच.व्ही.सरदेसाई यांचा जन्मदिन**

'धन्वंतरी घरोघरी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १२९/-**

**११ एप्रिल - डॉ.सुनीलकुमार लवटे यांचा जन्मदिन**

**संच १ -** 'भारतीय साहित्यिक', 'खाली जमीन वर आकाश', 'समकालीन साहित्यिक' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७००/- । सवलत किंमत ४२०/-**

'In Between', 'Science Of Reading' या पुस्तकावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६४५/- । सवलत किंमत ३९०/-**

**११ एप्रिल - महात्मा फुले यांचा जन्मदिन**

'शेतकऱ्याचा असूड', 'महात्मा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७१०/- । सवलत किंमत ४२६/-**

**१२ एप्रिल - छाया महाजन यांचा जन्मदिन**

'कॉलेज', 'मानसी', 'एकादश कथा', 'यशोदा', 'मुलखावेगळा', 'अज्ञात' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १२८०/- । सवलत किंमत ८६९/-**

**१३ एप्रिल - जालियनवाला बाग हत्याकांड दिन**

'जालियनवाला बाग' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३३९/-**

**१४ एप्रिल - द.मा.मिरासदार यांचा जन्मदिन**

द.मा.मिरासदार यांच्या २५ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४७५०/- । सवलत किंमत ३६९७/-**

**१४ एप्रिल - आशा आपराद यांचा जन्मदिन**

'भोगले जे दु:ख त्याला...' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत २९५/-**

**१४ एप्रिल - डॉ. रवींद्र ठाकूर यांचा जन्मदिन**

'व्हायरस', 'महात्मा', 'धर्मयुद्ध', 'दाही दिशा' या पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १६९०/- । सवलत किंमत १००२/-**

'Mahatma Jyotirao Phule' (English) या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ७९५/- । सवलत किंमत ४६९/-**

---

**१५ एप्रिल - जेफ्री आर्चर यांचा जन्मदिन**

जेफ्री आर्चर यांच्या ३२ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १८२०७/- । सवलत किंमत १३६५५/-**

---

**१५ एप्रिल - रवीन्द्र बागडे यांचा जन्मदिन**

'बोचकं', 'गटुळं' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १७९/-**

---

**१५ एप्रिल - डॉ.लक्ष्मीनारायण बोल्ली यांचा जन्मदिन**

'कृष्णदेवराय' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २३७/-**

◆

**- किमतींमध्ये बदलाची शक्यता -**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / Whats App No. ९४२०५९४६६५

website : www.mehtapublishinghouse.com

**आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा या ईमेलवर पाठवा.**

author@mehtapublishinghouse.com

# नवी अनुभूती

ये नवलाची आज प्रतीती
नव्या जीवनीं नव अनुभूती!

नव क्षितिजावर
नवाच भास्कर
नवकिरणांची वितरी दीप्ती
नव भूमीवर
नवे तृणांकुर
नवा तजेला खुलतो वरती
नव साम्राज्यें
नवीं क्षितीजें
नव आकांक्षा मनीं स्फुरविती.

नव्या भावना
नव्या कामना
नव अश्रू, नव हास्यें फुलती.
स्वप्नें नूतन
सत्यें नूतन
नवचैतन्यें नटुनि झळकती
सर्व नवोनव
विलसे वैभव
नवजीवन विस्तरलें पुढतीं.

ये नवलाची आज प्रतीती
नव्या जीवनीं नव अनुभूती!








**(शान्ता शेळके लिखित ‘वर्षा’ काव्यसंग्रहातून)**


RNI. No. MAHMAR/2000/02739
Posting at BPC - Round Garden, Vijayanagar Colony, Sadashiv Peth, Pune - 411030.
Publication Date : 11/03/2026 Posting Date : 11/03/2026


## आवर्जून वाचावं













**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन - (०२०) २४४७६९२४

प्रति, ______________________